बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ५२ | बुधवार,दि.०६ डिसेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# भाईजींच्या प्रधानमंत्री मोदी-शहांच्या अभिनंदन फलकाने लोकसभेची चाहूल

**गोंदिया:** नुकत्याच पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवत तीन राज्ये काबिज केली. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह आणि जे.पी.नड्डा यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या अभिनंदनाच्या वर्षावातच महाराष्ट्रातील अजीत पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने आघाडी घेतली आहे. राज्यातील भंडारा-लोकसभा मतदार संघाचा विचार केल्यास भाजपच्या विद्यमान खासदारांपेक्षाही अजीत गटाचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी पंतप्रधान मोदी यांच्या अभिनंदनाच्या होर्डिंग फलकामध्ये आघाडी घेतल्याने मतदार संघातील राजकारणात चलविचल निर्माण झाली आहे.

तीन राज्यं जिंकल्यानंतर खासदार प्रफुल्ल पटेल यांनी रविवारीच (ता. ४) ट्विटवर (एक्स) पोस्ट करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करित तीसऱ्यांदा पंतप्रधान होणार असे म्हटले. तीन राज्यांतील भाजपचा विजय म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाचे यश असल्याचे त्यांनी नमूद केले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस एनडीएचा समर्थक या नात्याने मोदींचे यासाठी अभिनंदन करतो. राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधील विजय हा अभूतपूर्व असाच आहे. राष्ट्राप्रती असलेल्या समर्पण भावनेमुळंच मतदारांनी भाजपच्या पदारात विजय टाकल्याचे, खासदार पटेल यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले होते.

सोशल मीडियावर पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन केल्यानंतर सोमवारी (ता. ४) "भाईजी' ना- वाने सुपरिचित असलेल्या पटेल यांनी भंडारा-गोंदियातून भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे जाहीर अभिनंदन केले. संपूर्ण लोकसभा मतदारसंघात खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या या होर्डिंग्जने दोन्ही




जिल्ह्याचे लक्ष वेधले आहे.

शरद पवारांची साथ सोडत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांनी भाजपची कास धरलीय. सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस राज्यात भाजप-शिवसेना एकनाथ शिंदे गटासोबत महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी आहे. केंद्रातही राष्ट्रवादीने "एनडीए'मध्ये प्रवेश मिळविला आहे. अशात लोकसभा निवडणूक लढण्याबाबत खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आ- पली भूमिका आधीच स्पष्ट केली.

बिरसी विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी आपण भाजपचे विद्यमान खासदार सुनील मेंढे यांच्याशी आधी चर्चा करूव त्यानंतरही काय तो निर्णय घेऊ असे जाहीर केले. खासदार मेंढे यांनीही याच कार्यक्रमात पटेल यांचा राष्ट्रीय नेते असा उल्लेख करीत आपलीही दिलद- ारी दाखवून दिली. भाजपही तितकाच सकारात्मक प्रतिसाद देत असल्याची चर्चा भंडारा-गोंदियातील राजकीय वर्तुळात आहे. त्यातच एकीकडे भाईजी लोकसभा निवडणूक लढविण्यावर आपली भूमिका स्पष्ट करीत नसतानाच बंद पडलेल्या लाखांदूरचा साखर कारखाना सुरु करणे आणि लोकसभा मतदार संघात मोदी-शहांचे अभिनंदनाचे होर्डिंग्स लावणे यावरुन भाईजींच्या मनात एक आणि ओठात एक असे चित्र असल्याची चर्चा जनतेमध्ये आहे.

भाईजींवर केंद्रीय विमानमंत्री असतानाच दिल्ली येथील विमानतळाच्या प्रकरणातील घोटाळा आणि मुंबईतील सीजे हाऊस प्रकरणाची सुरु असलेली ईडी चौकशी या दोन कारणांमुळे भाईजी भाजपच्या जवळीक जात असल्याची चर्चा आहे. मोदींजीचेच नेतृत्व मान्य करीत असल्याने आम्ही ही त्यांना स्विकारुन घेवू असे आता भाजपचे कार्यकर्ते ही बोलू लागले आहेत.


## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ७ डिसेंबरपासून

**मुंबई:** राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३ पासून सुरू होणार आहे. विधानभवन मुंबई येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील विधानसभा विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार, मंत्री, दोन्ही सभागृहाचे सदस्य, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित मान्यवर उपस्थित होते.

हिवाळी अधिवेशन गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३ ते बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ या कालावधीत पार पडणार आहे. अधिवेशनाचे एकूण दिवस १४ (सुट्ट्यासह) प्रत्यक्ष कामकाज १० दिवस, सुट्या (शनिवार व रविवार) ४ दिवस.

## राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य लक्ष्मण हाके यांनी दिला पत्राद्वारे राजीनामा





**पुणे :** राज्यात आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज आक्रमक झाला आहे.मनोज जरांगे यांनी २४ डिसेंबरचा अल्टिमेटम दिल्यानंतर आरक्षण देण्यासाठी विविध पातळ्यांवर काम सुरु केले आहे. राज्य मागासवर्गीय आयोगाकडूनही मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी कामकाज सुरु आहे. मात्र आयोगातील मतभेद उघड झाले आहे. आयोगाचे सदस्य बाल- ाजी किल्लारीकर यांनी राजीनामा दिल्यानंतर आता सदस्य लक्ष्मण हाके यांनी पत्राद्वारे राजीनामा दिला आहे.

सर्व समाजाच्या मागास- लेपणाचे सर्व्हेक्षण करावे अशी मागणी किल्लारीकर यांनी केली होती. पण, याबाबत एकवाक्यता न झाल्याने त्यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर आता हाके यांनी सुद्धा राजीनामा दिला आहे. मागासवर्ग आयोगातील इतर काही सदस्यांमध्ये देखील अस्वस्थता असल्याचे सांगण्यात येते.

### लक्ष्मण हाके यांनी पत्रात काय म्हटलं ?

**मी लक्ष्मण सोपान हाके, सदस्य महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग या पदावर जून २०२३ पासून कार्यरत असून, दिनांक ९/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत माझ्या व आयोगाच्या वैचारीक मतभेदामुळे व्यथित होऊन माझ्या सदस्य पदाचा राजीनामा देत आहे.**

## बिरसीवरुन इंडिगोच्या पहिल्या प्रवासी विमानाने घेतली झेप

**गोंदिया:-** गोंदिया जिल्ह्या- तील बिरसी विमानतळावर प्रदिर्घ कालावधीनंतर आज १ डिसेंबरला गोंदियाच्या बिरसी विमानतळावर इंडिगो कंपनीच्या प्रवासी विमानाचे ४० प्रवाश्यासह आगमन झाले.तर गोंदियाच्या बिरसी विमानतळावरुन हैद्राबाद तिरुपती करीता इंडिगोच्या विमानाने पहिले उड्डाण १२.५५ मिनिटाने घेतले.याविमानात गोंदिया जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक लंजे यांच्यासह ५५ प्रवाशांनी प्रवास केला.उड्डाणाच्या शुभारंभप्रसंगी माजी विमान वाहतूक मंत्री व खासदार प्रफुल पटेल यांनी आज ही सेवा सुरु होत आहे,ती टिकवून ठेवण्याकरीता आपल्या सर्वांचे सहकार्य लाभले तर भविष्यात गोंदिया मुंबई सरळ विमानसेवा इंडिगोच्यावतीने सुरु करण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन दिले.

मध्यप्रदेश व शेजारील जिल्ह्यातील व्यापारी,अधिकारी व व्यवसायिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.मध्यप्रदेशातील कान्हा केसरी व्याघ्रप्रकल्पाकरीता व नागझिरा नवेगावबांध व्याघ्र प्रकल्पाकरीता हे विमानतळ जवळचे असल्याने देशातील व विदेशातील पर्यटकांनाही लाभ होणार असल्याचे म्हणाले.गोंदिया हैद्राबाद तिरुपती विमानाला खासदार प्रफुल पटेल,खासदार सुनिल मेंढे,जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले,आमदार विनोद अग्रवाल,जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे,पोलीस अधिक्षक निखील पिंगळे,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्यासह अनेकांनी गोंदिया हैद्राबाद तिरुपती विमान सेवेला हिरवी झेंडी दाखवत रवाना केले भारतीय विमानसेवेच्या क्षेत्रात कार्य करण्याची संधी आपल्याला मिळाली आणि त्याचा एक भाग आपल्या गृहनगर गोंदियात आणू शकलो हे माझ्यासाठी गर्वाची बाब आहे.

या विमानसेवेमुळे गोंदिया- भंडारा जिल्ह्यासह शेजारच्या मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्याच्या विकासातही भर पडणार असून परिसरातील व्यापार,व्यवसाय व पर्यटनालाही चालना मिळणार आहे. आजघडीला देशाच्या आकाशात ७०० विमान उडत असताना त्यात इंडिगोचे साडेतीनशे विमान आहेत. तर लवकरच मुंबई येथील विमानतळाचे काम पूर्ण झाल्यावर थेट गोंदिया ते मुंबई विमानसेवा सुरु व्हावी यासाठीही आपले प्रयत्न राहणार आहेत. मात्र, त्यासाठी या विमानसेवेला चांगला प्रतिसाद मिळणे अपेक्षित असल्याचे खासदार पटेल म्हणाले.



### कान्हा व्याघ्र प्रकल्पासाठी प्रवेशद्वार-सिन्हा

**विमान सेवा शुभारंभ प्रसंगी इंडिगोचे उपाध्यक्ष आर.के.सिन्हा यांनी आभासी पद्धतीने कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. यावेळी त्यांनी इंडिगो विमान सेवेची ही २०१४ वी उड्डाण राहणार असल्याचे सांगून या विमानसेवेचा जिल्ह्यातील नागरिकांना लाभ होणार असल्याचे सांगितले. तर देश विदेशच्या पर्यटकांना मध्यप्रदेशातील कान्हा राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्यासाठी बिरसी विमानतळ प्रवेशद्वार ठरणार असल्याचे ते म्हणाले.**

## १४ डिसेंबरपासून १७ लाख कर्मचारी संपावर-आशिष रामटेके

**गोंदिया :** जुनी पेंशन योजना पूर्वलक्षीप्रभावप्रमाणे लागू करावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना स्थायी सेवेत सामावून घ्यावे, अनुकंपा यादीतील उमेदवारांना सेवेत सामावून घ्यावे, रिक्त पदे भरावी यासह १७ मागण्यांसाठी मार्च महिन्यात आम्ही सात दिवस संप केला होता. मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी आम्हा मागण्या मंजूर करण्याबाबत लेखी आश्वासन दिले होते. आजवर त्याबाबत कुठलीच कार्यवाही झालेली नाही. सरकारने जर आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर १४ डिसेंबरपासून राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी पुन्हा बेमुदत संपावर जाणार आहेत. असा इशारा राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्राचे सहसचिव आशिष प्र.रामटेके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिला आहे.



रामटेके म्हणाले, मार्च २०२३ मध्ये आम्ही सात दिवस संप पुकारला होता. जुनी पेंशन योजना पूर्वलक्षीप्रभावाने लागू करावी ही आमची प्रमुख मागणी होती. राज्यातील चार लाख रिक्त पदे भरावीत, राज्यात ८३ हजार कर्मचारी गेल्या १५ वर्षांपासून कंत्राटी पद्धतीने काम करतात, त्यांच्या सेवा नियमित कराव्यात, यासह विविध १७ मागण्या होत्या. सात दिवसांच्या संपानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिष्टमंडळाशी चर्चा केली. त्यावेळी ३० सचिव हजर होते. जुनी पेंशन योजनेसाठी सुबोधकुमार समिती नेमली. समितीने तीन महिन्यांत अहवाल देणे अपेक्षित होते. अहवाल अद्याप पूर्ण झाला नाही, असेही ते म्हणाले.राजस्थान, ओरिसा या राज्यांमध्ये जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली जातात मग आपल्याकडे का नाही? आम्ही १४ डिसेंबरची मुदत दिली आहे. तोवर मागण्या मान्य झाल्या नाही तर बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा निवेदनातून आशिष रामटेके यांनी राज्यसरकारला दिला आहे.

## मतदार याद्या अचुक करण्यावर व नव युवा मतदार नोंदणीवर सर्वाधिक भर द्यावा-विजयलक्ष्मी बिदरी

**गोंदिया** : आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदार याद्या अचुक आणि निर्दोष करण्यावर तसेच नव युवा मतदार नोंदणीवर सर्वाधिक भर द्यावा, असे निर्देश मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मतदार यादी तपासणीच्या अनुषंगाने दूरदृष्य प्रमाणीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी श्रीमती बिदरी बोलत होत्या. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार व विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी म्हणाल्या, आगामी वर्ष निवडणुकांचे असल्याने निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक तयारी करायची आहे. भारत निवडणूक आयोगाने यापुर्वीच याबाबत सर्व तयारी सुरु केली आहे. आयोगाने सर्व मतदार संघातील कायदा व सुव्यवस्था, मतदान केंद्रांची तयारी, संवेदनशील मतदान केंद्र निश्चिती आदींचा यापुर्वीच आढावा घेतलेला आहे. त्यामुळे सर्व यंत्रणेने, प्रशासनाने आयोगाच्या सूचनांचे बारकाईने अवलोकन करावे.

मतदान यंत्रणेसाठी आवश्यक सर्व साधन सामग्रीचे व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन आदींसाठी सक्षम अधिकारी, मनुष्यबळ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी नेमावे. निवडणूक यंत्रणेवर दोषारोप होऊ नयेत यासाठी अत्यंत काळजीपूर्वक काम करावे. त्यासाठी मतदार यादी अचुक, निदोष असेल याकडे सर्वाधिक लक्ष द्यावे असे श्रीमती बिदरी म्हणाल्या.

मतदार यादी निदोष करण्यासाठी मयत मतदारांची वगळणी, कायमस्वरुपी स्थलांतरीत मतदार, दुबार मतदार वगळणी याला सर्वाधिक भर द्यावा. मतदार यादीची योग्य पडताळणी करुन मयत मतदारांची वगळणी, मतदार यादीमध्ये अस्पष्ट छायाचित्रे असलेले मतदार याची दुरुस्ती करायची आहे. नवीन मतदारांचा समावेश करण्यासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम अचुक राबवावा. ही सर्व कार्यवाही विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन करावी, असे केल्यास निश्चितपणे मतदानाच्या टक्केवारीमध्ये वाढ होईल असे त्यांनी सांगितले.



संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेत गावपातळीवर पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक यांची भागनिहाय याद्या तपासणीसाठी मदत घ्यावी. १८ वर्षावरील कोणताही नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहता कामा नये. युवा मतदार नोंदणीसाठी उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये यांच्याशी संपर्क साधून मदत घ्यावी. मतदार निवडणूक ओळखपत्र आधार कार्डाशी जोडण्यावर भर देण्यात यावा. मतदान केंद्र असलेल्या शासकीय शाळा व इतर इमारतींची दुरुस्ती असल्यास त्याचे नियोजन आतापासूनच करा. फॉर्म नं.६, ७ व ८ मधील नागरिकांचे दावे व हरकती प्रलंबित ठेवू नका असे त्यांनी यावेळी सांगितले.

गोंदिया जिल्ह्यात ६३-अर्जुनी मोरगांव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया, ६६-आमगाव (ड्ढ) असे चार विधानसभा मतदारसंघ असून मतदान केंद्राची संख्या एकूण १२८४ आहे. एकूण चार विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदार- ५,४५,९०२. स्त्री मतदार- ५,५०,५४८ व इतर- ०९, असे एकूण १०,९६,४५९ मतदार आहेत. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचेद्वारे २१ जुलै २०२३ ते २१ ऑगस्ट २०२३ पर्यंतच्या कालावधीत मतदारांची प्रत्यक्ष घरोघरी भेट देवून पताळणी करण्यात आली असून एकूण चार विधानसभा मतदारसंघात मृत मतदार- २६,२५४, स्थलांतरीत- २०,४६३, दुबार- १,२९९, असे एकूण ४८,०१६ मतदार वगळण्याची प्रक्रिया सुरु असून जिल्ह्यातील आधार क्रमांक जोडणी झालेल्या मतदारांची संख्या ६,८५,९८० आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी यावेळी दिली.

# संपूर्ण पिंडकेपार गावाचे अस्तित्व धोक्यात

## कटंगी धरणामुळे घरांना तडे: नागरिक रात्र काढतात जागून

**गोंदिया:** पाणी अडवा, पाणी जिरवा, असे म्हटले जाते. त्यादृष्टीने प्रयत्नदेखील सुरु आहेत. मात्र हाच प्रयोग आता नागरिकांच्या अंगलट येताना दिसत आहे. गोरेगाव तालुक्यातील कटंगी प्रकल्पामुळे पिंडकेपार या गावातील घरांना तडे जात असून ओल आला आहे. अनेक घरांची पडझड सुरु आहे. त्यामुळे नागरिकांना रात्र जागून काढावी लागत आहे. गोरेगाव तहसील अंतर्गत कटंगी मध्यम प्रकल्प १९९० मध्ये सुरु झाला होता. हा मध्यम प्रकल्प उभारण्यासाठी पिंडकेपार गावातील शेतकऱ्यांची १२३.२१ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली.


प्रकल्पात पाणीसाठा होत असल्याने पिंडकेपार गाव परिसरातील भूजल पातळीत वाढ झाली आहे. प्रकल्प झाल्यामुळे परिसरातील गावांतील शेतीला सिंचन उपलब्ध झाले आहे.

### ७ दिवसांत होणार सर्वेक्षण

**वारंवारचा पाठपुरावा आणि गावातील नागरिकांची स्थिती याकडे आता जिल्हा प्रशासनाने लक्ष घातले आहे. पुनर्वसन अनुदानाअंतर्गत गावात योजना राबविण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. पिंडकेपार गावाची खरी स्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण करुन त्याचा अहवाल तत्काळ ७ दिवसांत संबंधित विभागाला सादर करावा. असे पत्र शासनाने ३० नोव्हेंबर रोजी जारी केले आहे. शासनाच्या सुचना प्राप्त झाल्या असल्याने आता पिंडकेपारवासींमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे. मात्र शासन तातडीने उपाययोजना करते की पुन्हा दिरंगाईचे धोरण अवलंबले जाते. याकडे लक्ष लागले आहे.**

पिण्याच्या पाण्याची समस्या देखील सुटली आहे. मात्र त्याच पाण्याचे दुष्टपरिणामदेखील समोर येऊ लागले आहेत. पाणी पातळी वाढल्यामुळे पिंडकेपार गावातील कच्च्या घरांच्या भिंती ओल्या होतात. भिंती ओल्या झाल्यामुळे घरांची पडझड सुरु झाली आहे. जीर्ण घर जमीनदोस्त होण्याचा धोका नेहमीच असतो. संपूर्ण गावातील कच्च्या घरांच्या भिंती ओलसर झाल्या आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून हा धोका कायम आहे. अद्यापही अनेक घरे पडत आहेत. या प्रकारामुळे गावातील नागरिक धास्तावले आहेत. कधी घराचा कोणता कोपरा, भिंत पडेल याची शास्वती नाही. त्यामुळे पिंडकेपार येथील नागरिक दहशती- खाली जीवन जगत आहेत. जीर्ण झालेल्या घरांत राहणाऱ्या कुटुंबातील अनेकांनी दुसऱ्यांच्या घरात आसरा घेतला आहे. बहुतांश घरमालकांना मोडकडळीस आलेल्या घरात राहावे लागत आहे.



**धरणाच्या पाणी पातळीमुळे गावातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. जीव धोक्यात राहून वास्तव्य करत आ- हेत. विशेष पुनर्वसन कायद्यांतर्गत घरबांधणीसाठी १५ लाख किंवा घरकुल योजनेत प्राधान्य देण्यासंबंधाने जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात आले होते. वर्षभरानंतर आता शासनाने त्याची दखल घेतली. शासनाने दिरंगाई न करता तातडीने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी.**

**भरत घासले, उपसरपंच पिंडकेपार**

यासंदर्भात ग्रामपंचायतीच्यावतीने जिल्हा प्रशासनाला माहिती देण्यात आली होती. यासोबतच पिंडकेपार ग्रामस्थांना घरकुल योजनेत प्राधान्य देऊन घरे बांधण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी ग्रामस्थंनी जिल्हा प्रशासन, आमदार विनोद अग्रवाल व परिसरातील लोकप्रतिनिधींना पत्र देऊन केली होती.

# नक्षलवाद्यांच्या पीएलजीए सप्ताहात गोंदिया "अलर्ट"

## हिंसक कारवाया रोखण्यासाठी पोलिस सज्ज:सीमावर्ती भागात सर्चिंग ऑपरेशन

**गोंदिया:** जिल्ह्याच्या सीमेपासून ७ किमी अंतरावरील गडचिरोली जिल्ह्यातील कोरेची पोलीस ठाण्याच्या हद्दीत मयालघाट जंगलात पोलिसांचा खबऱ्या असल्याच्या संशयातून नक्षलवाद्यांनी चमरा मडावी नामक व्यक्तीची हत्या केली. जिल्हा नक्षलग्रस्त असल्याने २ ते ८ डिसेंबर दरम्यान नक्षलवाद्यांकडून पीएलजीए सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या पार्श्वभुमीवर नक्षलवाद्यांकडून जाळपोळ व हिंसक कारवाया केल्या जातात. त्यातच अशी घटना जिल्ह्यात घडू नये यासाठी गोंदिया पोलिसांनी अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांच्या हालचालींवर पोलिसांची करडी नजर आहे.

जिल्ह्यातील पिपरखारी सशस्त्र दुरक्षेत्रांतर्गत गोंदिया जिल्ह्याची सीमा आहे. जिल्ह्याच्या सीमेपासून ७ किमी अंतरावर असलेल्या कोरची पोलिस ठाण्याच्या हद्दीत मथालघाट जंगलात पोलिसांचा खबऱ्या असल्याच्या संशयावरुन नक्षलवाद्यांनी चमरा मडावी (मुरकुटी, जि.गडचिरोली) नामक व्यक्तींची हत्या केली. चमरा मडावी याच्या घरी शनिवारी (दि.२) रात्री १० ते १२ माओवादी आले होते व त्याला आपल्यासोबत लगतच्या मयालघाट जंगल परिसरात घेऊन गेले. माओवाद्यांनी पहाटे त्याची हत्या केली असून रविवारी (दि.३) सकाळी मुरकुटी लगत त्याचा मृतदेह आढळला. तसेच नक्षल पत्रके देखील टाकण्यात आली होती.

या पार्श्वभुमीवर गोंदिया जिल्ह्यात अलर्ट घोषित करण्यात आला आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिसांची कुमक नक्षलग्रस्त भागात पाठविण्यात आली आहे.

### सर्चिंग व कोबिंग ऑपरेशन सुरु

**नक्षलवाद्यांकडून पीएलजीए सप्ताहाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यात हाय अलर्ट देण्यात आल्यानंतर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागात जंगलात सर्चिंग ऑपरेशन सुरु करण्यात आले आहे. नक्षलवाद्यांनी गडचिरोली, छत्तीसगड किंवा मध्य प्रदेशात कोणतीही नक्षल घटना घडविल्यास नक्षलवादी रेस्टझोन म्हणून गोंदियाचा वापर करतात. त्यासाठी नक्षलवाद्यांची शोध मोहीम राबविली जात आहे.**



साप्ताहिक
# बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com


## संपादकीय

### भारताचा खलनायक

अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांचे निधन झाले. त्यांची ओळख एक अत्यंत अभ्यासपूर्ण स्कॉलर नेता, परराष्ट्र खात्याचा जाणकार आणि नाझी जर्मनीतून आलेला निर्वासित अशी असली तरीही भारतासाठी मात्र त्याची ओळख भारत–पाकिस्तान युद्धात खलनायकी चाली रचणारा आणि त्यासाठी कोणत्याही थराला जाणारा नेता अशीच आहे. गोष्ट भारत–पाकिस्तान युद्धाची. हे युद्ध होऊ नये म्हणून तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी जंगजंग पछाडले होते. पण पाकिस्तानी अध्यक्ष याह्या खान यांना चुचकारुनही ते युद्धावर ठाम होते. त्यासाठी अमेरिका आणि रशिया यांना यात मध्ये पडावे लागले. इंदिरा गांधी निक्सन याना भेटण्यासाठी गेल्या, तेव्हा त्यांची संभावना अत्यंत गलिच्छ शब्दांत करणारे हेच निक्सन महाशय होते. भारत–पाकिस्तान युद्ध सुरू झाल्यावर या किसिंजर महाशयांनी अध्यक्ष निक्सन यांना सल्ला दिला की, चीनने सीमेवर सैन्य तैनात करण्यासाठी दबाव आणावा. त्यामुळे भारताची एक बाजू कमजोर होऊन भारत युद्ध थांबवेल. किसिंजर हे निक्सन यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार होते. त्यानंतर ते जिराल्ड फोर्ड यांच्या काळातही याच पदावर होते. पण त्यांची भूमिका भारत–पाक युद्धात आणि नंतर काही काळ चर्चेत राहिली. वादग्रस्त अशीच त्यांची भूमिका होती आणि ते संपूर्ण भारतविरोधी होते.

निक्सन आणि किसिंजर हे दोघेही भारताला धमकावण्याचा प्रयत्न करत होते. आधुनिक अमेरिकन इतिहासात किसिंजर हे सर्वात महत्त्वाची व्यक्ती होते. त्यांनीच व्हिएतनाम युद्धाला अमेरिकेला उभे केले. त्यातून त्यांना बदनामीचा सामना करावा लागला. पण त्यांचे खरे काळे कारस्थान भारत पाकिस्तान युद्धात समोर आले. भारताच्या कल्याणाची भाषा करणारा हा माणूस आतून किती खलनायकी आहे, हे त्यावेळी जगाने पाहिले. व्हिएतनाम युद्ध थांबवण्यात प्रमुख भूमिका निभावणारा हा खलनायक भारत–पाकिस्तान युद्धाच्या वेळी भारताच्या संपूर्ण विरोधी होता. त्याला हे युद्ध होणे नको होते. त्यासाठी अमेरिकेने वाट्टेल त्या मार्गाने याह्या खानचे लांगूलचालन करावे या मताचा तो होता. किसिंजर आणि निक्सन या दोघांनीही त्यावेळेला भारताला धमकावण्याचा एकत्रित प्रयत्न केला होता. जेव्हा इंदिरा गांधी अमेरिकेला भेटण्यास गेल्या, तेव्हा त्यांना बराच काळ ताटकळत ठेवण्यात आले. पण त्यापेक्षा हे महत्त्वाचे आहे की, किसिंजर यांनी निक्सन यांना सल्ला दिला की, चिनी सैन्य सीमेवर तैनात करण्यासाठी अमेरिकेने दबाव आणावा. हा काळ होता शीतयुद्धाचा. अमेरिका आणि रशिया सारखेच ताकदवान देश होते. पण किसिंजर यांचा हा कुटिल डाव चीननेच उधळला. चीनने सीमेवर सैन्य तैनात करण्यास साफ नकार दिला. परिणामी भारताने पाकिस्तानचे तुकडेच पाडले आणि बांगलादेश नावाचा देश अस्तित्वात आला.

किसिंजर यांनी चीनच्या नकारानंतरही एक डाव रचला होता. त्यांनी चिनी अधिकारी हुआंग हुआ यांच्याशी एक गुप्त बैठक ठरवली होती. किसिंजर यांना भारतद्वेषाने इतके पछाडले होते की, त्यांनी रशियाने जर चिनी सीमेवर सैन्य तैनात केले, तर चिनी उपग्रहांवरुन आलेली माहिती ते लगेच रशियाला देतील. तोही डाव उधळला गेल्यानंतर किसिंजर या खलनायकाने नवा डाव खेळला. त्यांनी निक्सन यांना बोलून एक भयंकर सल्ला दिला. त्यासाठी त्यांना इतिहास कधीही क्षमा करणार नाही. त्यांनी निक्सन यांना सांगितले की, आपल्या युद्धनौका बंगालच्या खाडीत आणून ठेवाव्यात. हा सारा आटापिटा पाकिस्तानला भारताने हरवू नये म्हणून चालला होता. निक्सन तर संतप्तच होते. त्यांची भाषा भारतीय नेत्यांबद्दल अत्यंत गलिच्छ होती.

१५ डिसेंबर १९७१ हा तो काळा दिवस होता. त्यादिवशी निक्सन यांच्या आदेशावरुन अमेरिकेचे सातवे आरमार बंगालच्या खाडीत दाखल झाले. अमेरिकन आरमार निश्चितच भारताच्या दिशने, पण अत्यंत हळू वेगाने सरकत होते. ते पाहिल्यावर रशियाने आपल्या सैन्याला खाडीत जमा होण्याचा आदेश दिला. त्यानंतर अमेरिकेन आरमाराने माघार घेतली. हा धोका टळला, पण अमेरिकेची मनीषा चांगली दिसत नव्हती. पण यासाठी दुसरेही एक कारण दिले जाते. भारताचे राजनीतीज्ञ अरुंधती घोष यांनी सांगितले की, पाकिस्तानचे जनरल नियाझी यानी भारताला आम्हाला युद्धबंदी हवी आहे, असा संदेश पाठवला. त्यानंतर अमेरिकन आरमार परतले. जग आज सर्वात विद्वान आणि परराष्ट्र धोरणाचा गाढा अभ्यासक म्हणून ओळखते. किसिंजर यांच्या नावाने अनेक फेलोशिप दिल्या जातात. पण त्यांनी भारत–पाकिस्तान युद्धाचा खरा खलनायक इतकीच ओळख भारतासाठी आहे. नाझी जर्मनीतून आलेला हा विद्वान माणूस राष्ट्राध्यक्षाचा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून पोहोचला. पण त्याने भारतविरोधी भूमिका का घेतली आणि पाकिस्तानचे लांगूलचालन का केले? हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

निक्सन यांना जगातील युद्ध थांबवण्यासाठी शांतता दूत म्हणून समोर यावे असे वाटत होते. त्यातून त्यांनी भारतविरोधात जाऊन भारत–पाकिस्तान युद्धात खलनायकाची भूमिका बजावली. पण खरा खलनायक हेन्री किसिंजर हेच होते. असो. आता ते या जगात नाहीत. पण त्यांच्या दुष्कृत्यांची साक्ष देणारा इतिहास, तर पानापानांवर आहे. किसिंजर यांच्या निधनाने त्या काळातील एक दुवा निखळला आहे. किसिजर यांच्या आरमार पाठवण्याच्या भूमिकेनंतर आशियाई सत्ता समतोल बदलून गेला. त्यानंतर आज इतके पाणी पुलाखालून वाहून गेले. मोदी यांच्या सत्तातरांनंतर उपखंडातील स्थिती कमालीची बदलली. भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे आणि किसिंजर यांची अपेक्षा कधीही केली नसेल. आज पाकिस्तानला चुचकारण्याची अमेरिकेला गरज राहिली नाही. त्यामुळे अमेरिकेने पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत बंद केली. पाकिस्तान आज कंगाल झाला आहे. आणि त्यात आता अमेरिका पाकिस्तानकडे ढुंकूनही पाहत नाही.

किसिंजर यांच्या पाकिस्तानवादी धोरणाचे कमालीचे हे अपयश आहे. किसिंजर आणि निक्सन या जोडीने जितका म्हणून भारताचा अपमान केला, त्या प्रत्येक अपमानाचा बदला त्यांना चुकवावा लागला. हा नियतीने उगवलेला सूड होता. म्हणून किसिंजर शंभराव्या वर्षी गेले असले तरीही त्यांना आपण भारताच्या बाबतीत का अपयशी ठरलो, याची खंत वाटत असली पाहिजे. भारताचा उदय झालेला किसिंजर यांना पहावे लागले. जे भारत बांगलादेश युद्ध टाळण्यासाठी निक्सन आणि किसिंजर जोडीने जंगजंग पछाडले, ते तर त्यांना पाहावेच लागले. पण पाकिस्तानचे तुकडेही झालेले पाहावे लागले. अमेरिकेच्या जगभरातील वर्चस्वाला इथूनच धक्का बसायला सुरुवात झाली. भारत–पाकिस्तान यांच्यात नंतर तीन युद्धे झाली आणि त्या त्या प्रत्येक वेळेस पाकिस्तानचा पराभव झाला. अमेरिकेसारखा बलाढ्य देश पाठीशी असूनही पाकिस्तानला पराभव सहन करावा लागला. भारतीय लष्कराचे सामर्थ्य अमेरिकेला आणि त्यांच्या तमाम नेत्यांना पाहावे लागले.

## वाचन संस्कृतीमुळे प्रत्येकांचा बौद्धिक विकास डॉ. सुगत चंद्रिकापुरे

**अर्जुनी मोरगाव:** प्रत्येकांचे घरात पुस्तकांचे कपाट असले पाहिजे. "वाचाल तर वाचाल" ही धोरणे अवलंबली पाहिजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्रशांत करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" हा मंत्र दिला. आपण पहिलीपासून पदवीपर्यंत शिक्षण घेतो तो पदव्या व नोकरी मिळविण्यासाठी मात्र अवांतर व इतर पुस्तकाचे वाचन केल्यास आपणाला समाजात कसे वावरायचे, आपला सामाजिक आर्थिक व कौटुंबिक विकास कसा करायचा हे सामान्य ज्ञान प्राप्त करण्यासाठी व जनरल ज्ञान प्राप्तीसाठी वाचन संस्कृती काळाची गरज असून त्यामुळे प्रत्येकांचा बौद्धिक विकास होतो असे आवाहन डॉ. सुगत चंद्रिकापुरे यांनी केले.

अर्जुनी मोर तालुक्यातील बोरटोला /इंजोरी या गट ग्रामपंचायतीला डॉ. सुगत चंद्रिकापुरे यांचे कडून स्पर्धा परीक्षेची पुस्तके संच ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी या क्षेत्राचे जि.प. सदस्य व गोंदिया जि.प. गटनेते लायकराम भेंडारकर, माजी जि.प. सदस्य किशोर तरोणे, तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, माजी सभापती राजेश नंदागवळी, सरपंच कुरुंदा वैद्य, चुनीलाल येरणे, ग्रा.प.सदस्य प्रेमलाल नारनवरे उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शिक्षणप्रेमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि विद्यार्थी



शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. त्यासाठी समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे. त्याकाळी तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये, समाजाच्या चुकीच्या विचारसरणीमुळे बहुजनांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. बाबासाहेबांचे (Babasaheb Ambedkar) वडील सैन्यात असल्याने विशेष शाळेत त्यांना प्राथमिक शिक्षण मिळाले. विद्यार्थी दशेपासून बाबासाहेबांनी जातिभेद, अपमानाकडे दुर्लक्ष करीत आपले शिक्षण चालू ठेवले. मॅट्रिकच्या शिक्षणानंतर बडोद्याच्या सयाजी गायकवाड यांनी त्यांची प्रखर बुद्धिमत्ता पाहून, शिष्यवृत्तीवर शिकायला परदेशात पाठविले.

बाबासाहेब चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे यश साजरे करताना दादासाहेब केळुसकरांनी "बुद्धाचे चरित्र' हे पुस्तक भेट दिले होते. नकळत त्याच पुस्तकांनी त्यांना साद घातली. गुरू गौतम बुद्धांची शिकवण आणि महात्मा फुलेंच्या कार्याचा त्यांच्या जीवनावर प्रभाव होता. संत कबीर आणि शाहू महाराजांना बाबासाहेब गुरू मानीत.

**लंडनमध्ये घडलेली छोटी घटना**

बाबासाहेब, लंचब्रेकमध्ये ग्रंथालयात बसून ब्रेड खाताना ग्रंथपाल यहुदीने त्यांना पकडले. दंड आकारला, त्यांची सदस्यता रद्द करणाऱ्यांची धमकी दिली. बाबासाहेबांनी प्रथम माफी मागत नम्रपणे मी येथे कोणत्या कारणासाठी आलो ते खरे सांगितले. कॅफेमध्ये खाण्यासाठी माझ्याकडे वेळ आणि पैसाही नाही. त्यांचे प्रामाणिक उत्तर ऐकल्यावर ग्रंथपाल यहुदी म्हणाले, आजपासून मी माझे जेवण तुमच्याबरोबर वाटून खाणार.

परदेशात शिकत असताना, नवा देश, नवी संस्कृती, नवे ज्ञान अनुभवले. माणसा–माणसांतील संबंधातील जाण आली. भेदभावाची कृत्रिम बंधनं नसलेला मुक्त समाज पहिला. शिक्षणाबरोबर बाबासाहेबांचे व्यक्तिमत्वही विकसित झाले. त्यांनी ओळखले, समाजातील परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही.

बॅरिस्टर होऊन डॉ. बाबासाहेब भारतात आल्यावर आपल्या बांधवांचे, दलितांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले; नव्हे त्यासाठीच भारतात आले. गुलामगिरीच्या बेड्या तोडून प्रथम त्यांना ताठ मानेने, स्वाभिमानाने जगायला शिकविले. निर्भय केले. शोषित वर्गाचे शिक्षण झालेच पाहिजे, हा बाबासाहेबांचा आग्रह. त्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांच्या वसतिगृहाची, रात्रीच्या शाळेची सोय करून, शिक्षणाची प्रेरणा दिली. "शका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश सगळ्यांना दिला. त्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटी, कालांतराने सिद्धार्थ, मिलिंद या मुंबई, औरंगाबाद येथे शिक्षण संस्था काढल्या.

त्या आधी दलित बांधवांच्या व्यथा मांडण्यासाठी शाहू महाराजांच्या मदतीने "मूकनायक', बहिष्कृत ही पाक्षिके; समाजाच्या, दलितांच्या विकासासाठी विविध वृत्तपत्रे, नियतकालिके चालवली. तरुणांसाठी क्रीडा मंडळे, विधायक संस्था, परिषदा, सभा–मेळाव्यांतून शिक्षणाचे महत्त्व सांगत होते.

"बहिष्कृत हितकारिणी' या संस्थेपासून डॉ. बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने सार्वजनिक आयुष्याला सुरुवात केली. "शिकवा, चेतवा आणि संघटित करा' या "हितकारिणी' संस्थेच्या ब्रीद वाक्यांत शिक्षणाला अग्रक्रम होता. दादासाहेब गायकवाडांना पत्रात लिहितात, "आपण इंग्रजीचा अभ्यास चालू ठेवायला हवा. इंग्रजीचे अज्ञान सार्वजनिक कामात पदोपदी नडेल, तरी इंग्रजीकडे दुर्लक्ष करू नका.' यावरून शिक्षणविषयक त्यांचा प्रगल्भ दृष्टिकोन दिसून येतो. महात्मा फुल्यांचा, सामाजिक, शैक्षणिक विषमता निर्मूलनाचा वारसा आंबेडकरांनी समर्थपणे पुढे नेला.

विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणसंस्थेचे निर्माते असा शिक्षणक्षेत्रात बाबासाहेबांचा चढता आलेख आहे. ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे.' म्हणून १४ वर्षापर्यंतचे प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे आणि मोफत केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांचे ज्ञान, वाचन, व्यासंग, लेखन, चिंतन आणि वक्तृत्व असे चौफेर व्यक्तिमत्त्व. त्यांचा स्वतःचा मोठा ग्रंथसंग्रह होता. स्वतः ते अठरा–अठरा तास अभ्यास करीत. शिक्षणासाठी जगभ्रमंती करून, आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून, अनेक विषयांत प्रभुत्व, अनेक पदव्या, अनेक भाषा प्राप्त केल्या होत्या. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांचा पुतळा किंवा चित्र पुस्तकांशिवाय पूर्ण झालेले दिसत नाही.

डॉ. बाबासाहेबांची विद्वत्ता, शैक्षणिक योग्यता, प्रतिभा व्यापक आणि भव्य होती. म्हणून त्यांना "जगातील सर्वात बुद्धिमान व्यक्ती' तसेच "सिम्बॉल ऑफ नॉलेज' म्हणून ओळखले जाते.

बाबासाहेबांचे विद्यार्थ्यांशी अतूट संबंध होते. "विद्यार्थ्यांनो जागृत राहा' या लेखात त्यांनी त्यांचे शिक्षण काळातील क्षणा–क्षणाचे महत्त्व विशद केले आहे. ते सांगतात, "काय शिकावं, हे विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. स्वतःची लायकी विद्यार्थीदशेतच वाढवा.' ज्ञान प्राप्त करण्याच्या संदर्भात म्हणतात, "विद्यार्थ्यांनो तुम्ही नुसते शिक्षण घेऊ नका, जे शिक्षण घ्याल, त्यात स्वतःला सिद्ध करा.'

पुणे येथील एका संमेलनात डॉ. आंबेडकर म्हणाले, "मी आजन्म विद्यार्थी आहे.' अति उच्च दर्जाची विद्वत्ता, ज्ञान असतानाही स्वतःला आजन्म विद्यार्थी मानणं आणि ते आदर्श विद्यार्थी ठरले, म्हणून शासनाने राज्यांत त्यांचा शाळा प्रवेशाचा दिवस (७ नोव्हेंबर) हा विद्यार्थी दिन म्हणून पाळला जातो.

**डॉ. आंबेडकरांचे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक विचार**

१. राष्ट्रहित आणि समाजहिताचे भान ठेवते ते खरे शिक्षण.
२. शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुला–मुलींना शिकू द्या. बालपणीच लग्न करू नका. शिक्षणामुळे आचार–विचारात बदल होतो.
३. मुला–मुलींच्या मनातील न्यूनगंड दूर करून त्यांना परंपरागत कामात न गुंतवता महत्त्वाकांक्षी बनवा.
४. विद्यार्थ्यांमध्ये राजकीय विचार रुजवावेत यासाठी ते सतत प्रयत्नशील होते.
५. विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन अज्ञान व खुळ्या समजुती दूर केल्या पाहिजेत.
६. मी प्रवास करताना मजजवळ नेहमी चार पुस्तके व वर्तमानपत्र असतात.
७. मला माणसांच्या सहवासापेक्षा पुस्तकांचा सहवास अधिक आवडतो.
८. देशाच्या विकासासाठी, बाबासाहेबांना त्यांचा विद्यार्थी हा भारतासाठी जगणारा, विज्ञानवादी असायला पाहिजे.
९. आपण राजकीय चळवळीला जेवढे महत्त्व देतो, तितके शिक्षण प्रसाराला देत नाही.
१०. डॉ. आंबेडकरांच्या मते व्यक्तीला; अस्तित्वाची, क्षमतेची आणि सामर्थ्याची जाणीव करून देते ते शिक्षण! निर्भय व्हा आणि जगाचे राज्य मिळवा.

शिक्षणप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "लोकशिक्षण' या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य केले. ते सांगतात, "विद्यार्थ्यांनो लक्षात ठेवा, शिक्षणाअभावी माणूस सर्वस्व गमावतो. सर्व मानव जन्मजात समान असून प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे. त्यासाठी सर्वांनी शिकले पाहिजे.'

६ डिसेंबर, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन!

**- मृणालिनी कुलकर्णी**

## सौंदड स्थानकावरील समस्यांचे निराकरण करा:अशोक लंजे



**सडक अर्जुनी:** सौंदड रेल्वे स्थानकावरील समस्यांचे निराकरण करण्यात यावे, अशी मागणी करीत जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक लंजे यांनी शिष्टमंडळासोबत रेल्वे मंडळ प्रबंधक नमिता त्रिपाठी यांची २७ नोव्हेंबर रोजी भेट घेऊन चर्चा केली व त्यांना मागण्यांचे निवेदन दिले.

चांदाफोर्ट–नागभिड–गोंदिया रेल्वे मार्गावर १ डिसेंबर रोजी बिलासपुरचे रेल्वे महाप्रबंधक सौंदड येथे स्थानकाची सखोल पाहणी करण्यासाठी येत आ–हेत. त्या अनुषंगाने स्थानकावर तयारी सुरु असून, त्याची पाहणी करण्यासाठी २७ नोव्हेंबर रोजी नागपूर विभागाच्या मंडळ प्रबंधक त्रिपाठी सौंदड येथे आल्या होत्या. यावर लंजे यांच्यासह शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन चर्चा केली. यादरम्यान त्यांनी कोरोना काळात बंद केलेल्या बिलासपूर–चेन्नई–यशवंतपुर–कोरबा एक्सप्रेस गाडीचा थांबा सौंदड येथे सुरु करा, जबलपूर,चंद्रपूर गाडीचा थांबा सौंदड, अर्जुनी मोरगाव, वडसा व मूल येथे द्या, संगणिकृत आरक्षित केंद्र सौंदड येथे दिवसभर सुरु करा तसेच प्रतीक्षालय निर्मिती करा, लोकल गाडीचा विशेष दर्जा हटवून रेल्वे भाडे जुन्याप्रमाणेच करा तसेच सायंकाळी ७ वाजता गोंदिया सुटणारी गाडी क्रमांक ०८८०६ प्रवासी गाडी परत सुरु करा तसेच डीआरएम कार्यालय नागपूर येथून गोंदिया येथे स्थानांतरित करा, तसेच सौंदड रेल्वे स्थानकावरील समस्यांचे निराकरण करण्यात यावे, अशी मागणी करीत निवेदन दिले. निवेदन देताना जयप्रकाश मोदी, विष्णू अग्रवाल, नरेंद्र बडोले, नरहरी राऊत, गरीबदास टेंभुर्णे, दिलीप शहारे आदी उपस्थित होते.

## जिल्ह्याच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध–राजेंद्र जैन



**गोंदिया:** बिरसी विमानतळावरुन नियमित हवाई सेवा सुरु झाली असून यामुळे व्यापाराला चालना मिळेल. धान खरेदी केंद्र सुरु करावे व शेतकऱ्यांच्या धानाला बोनस मिळावा यासाठी खासदार प्रफुल्ल पटेल तत्पर आहेत. ते जिल्ह्याचा विकास करण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

तालुक्यातील ग्राम कटंगी कला येथे जि.प. सभापती पूजा सेठ यांच्या प्रयत्नाने सेंट्रल कृषक संस्था समोरील सिमेंट रस्ता, नाली व गट्टू बांधकामाला सुरुवात करताना ते बोलत होते. याप्रसंगी बाळकृष्ण पटले, मोहिनी वराडे, महेश लांजेवार, अखिल सिंग ठाकुर, अनिल हिरकने, डॉ. योगराज तुरकर, दीपक बन्सोड, राजू महारवाडे, उमेश बावनकर, तीर्थराज बघेले, रवीकला नागपुरे, मुमताज पठाण, सुभाष बावनकर, दीपक डोंगरवार, मंजीत सहारे, शिशुपाल उपरीकर, शैलेश वासनिक, कृष्णा प्रजापती, दिलीप मोहनकर, रंजीत ऋषी, कमला श्रीभद्रे, ललिता वराडे, देवीश्री नागरीकर, दीपलता बाणेवार, रफिक शेख, नीलुश देशभ्रतार, पप्पू नागपुरे, जियालाल कटरे, आबिद शेख, संतोष फुंडे, छमेंद्र नागरीकर, राजेश वराडे, धीरज घोसे सहीत मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. संचालन सदाशिव वाघाडे यांनी केले. आभार तीर्थराज बघेले यांनी मानले.

## राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक



**तिरोडा:** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ची आढावा बैठक तिरोडा येथे पार पडली. यावेळी पक्षाचे युवा नेते सलील देशमुख आणि रविकांत बोपचे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत आ. रोहीत पवार यांच्या नेतृत्वात युवा संघर्ष यात्रेची समारोप सभा येत्या १२ डिसेंबर रोजी नागपूर येथे होणार आहे. समारोप सभा व युवक संघर्ष यात्रेची माहिती देण्यासाठी राष्ट्रवादीचे युवा नेते सलील देशमुख गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक तिरोडा येथील जनसंपर्क कार्यालयात पार पडली.

आढावा बैठकीत सलील देशमुख यांच्यासह रविकांत बोपचे यांनी उपस्थित पदाधिकारी व सहकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना संघर्ष यात्रेची माहिती पोहोचवावी, असे आवाहन केले. यावेळी जिल्हा अध्यक्ष सौरभ रोकडे, कार्याध्यक्ष बाबा बैस, सुधीर वासनिक, इकबाल, तालुकाध्यक्ष हेमराज अंबुले, संजय रहांगडाले, आदींसह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बफर क्षेत्रातील गावांकरीता १२ डिसेंबरला व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

**गोंदिया :** नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचा १० वा स्थापना दिवस साजरा करावयाचा असल्याने नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रांतर्गत बफर क्षेत्रातील गावांकरीता १२ डिसेंबर २०२३ रोजी हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून बफर क्षेत्रात समाविष्ट असलेल्या सर्व गावातील इच्छुक व्हॉलीबॉल चमुने स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरीता वनपरिक्षेत्र अधिकारी नागझिरा, वनपरिक्षेत्र अधिकारी पिटेझरी, वनपरिक्षेत्र अधिकारी उमरझरी, वनपरिक्षेत्र अधिकारी नवेगाव पार्क, वनपरिक्षेत्र अधिकारी डोंगरगाव, वनपरिक्षेत्र अधिकारी बोंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी कोका कार्यालयाशी संपर्क साधावा.

# ओबीसीके अंगने में तुम्हारा क्या काम है?



आपलेच ओबीसी म्हणून कधी कधी ओबीसीच्या कार्यक्रमात तथाकथित ओबीसी नेते बोलावले जातात. पण ते केवळ नाममात्र ओबीसी असतात, ओबीसी समाजाचे नसतातच, त्यांना ओबीसी प्रश्नांशी, ओबीसी लढ्याशी दमडीचेही देणेघेणे असत नाही. ओबीसी कार्यक्रमात जाऊन संभ्रम निर्माण कसा करता येईल, याच हेतूने ते ऐन भरात आलेल्या उभ्या पिकावर जशी कीड यावी तसे ओबीसीच्या कार्यक्रमात येऊन ओबीसी विरोधकांचं काम सोपं करतात. ओबीसी विरोधक जसे आरक्षण ओबीसी मधल्या गरीबांना दिले पाहिजे म्हणून फुसक्या सोडतात, क्रीमिलेयरचं लंगडं समर्थन करतात, एससी–एसटीला मिळणाऱ्या सवलती ओबीसीला मिळत नाही म्हणून त्यांच्याबद्दल द्वेष पेरतात. हुश्शार असूनही लायकी नसलेल्या लोकांच्या हाताखाली काम करावे लागते असं बोलणारे खुल्या प्रवर्गातील अनिर्बंध आरक्षणावर ब्र ही काढत नाही. तसेच हे हलक्या कानाचे आरक्षणाचा विरोध नानाविध क्लृप्त्या योजून करत असतात. पालखीचे भोई असतात तसे एकप्रकारे त्यांना ते नेमून दिलेले कामच असते.

आरक्षण म्हणजे गरीबी हटाव कार्यक्रम नाही. जातीउतरंडीत अन्याय झालेल्या शैक्षणिक सामाजिक दृष्टीने मागास असलेल्या जातीच्या प्रवर्गाला पुढारलेल्या समाजाबरोबर आणण्यासाठी केलेल्या न्याय्य संवैधानिक तरतूदी होत. चातुर्वर्ण चौकटीत असलेली शिक्षणबंदी आणि त्यातून आलेले शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक आर्थिक मागासलेपण ही शुद्रातिशुद्रांची दुखरी नस आहे. त्यामुळे त्यांना शिक्षणाची आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रियेत प्रतिनिधित्वाची संधी आरक्षणाच्या माध्यमातून दिलेली आहे. गरीबी हटवण्याच्या यापेक्षा वेगळ्या सरकारी योजना असतात. हे त्यांना समजत नाही असं कसं म्हणता येईल? पण ओबीसीच्या तंबूत उच्चजातीय अस्सल आरक्षणविरोधक येऊ शकत नाही, अशांच्या सोबत राजकारणात लगट असणारे, ओबीसी म्हणून मिरवत ओबीसीमधल्या माळी, तेली, कुणबी, धनगर, यादव, पवार, वंजारी, आगरी, भंडारी अशा मोठ्या जातसमूहाची गठ्ठामतं आरक्षण विरोधकांच्या झोळीत भरायची अन् त्यांनी उघड–छुप्या पद्धतीने आरक्षणाचा विरोध करायचा, अयोध्येतील राममंदिर मुद्दा उकरुन काढायचा रामरथ यात्रा काढायची, आणि ती अडवली म्हणून मंडल आयोग लागू करणाऱ्या व्ही.पी.सिंग सरकारचा पाठिंबा काढायचा. शुद्रातिशुद्रांचा हरिविठ्ठल करु पाहणाऱ्या उच्चजातवर्चस्ववादी व्यवस्थेचा जे अविरत उदोउदो करत असतात, त्यांच्याच कानगोष्टी ऐकत आपली मतं बनवणारी ही नकली ओबीसी माणसं ओबीसीचं कसं हित साधू शकतील?

मंडल आयोगाच्या अंमलानंतर आरक्षण विरोधकांनी ओबीसी आरक्षणाला क्रीमीलेयरचं ग्रहण लावून ठेवलं. मुळात आरक्षणाच्या तरतुदीत क्रीमीलेयर लावण्याचा उल्लेख नाही. कालेलकर आयोग, मंडल आयोग यांनी शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक आर्थिक अशा अनेक अंगाने मागासपणाचा व्यापक विचार करुन ओबीसींच्या आरक्षणाची शिफारस केली. त्यात क्रीमिलेयरचं अवाक्षरही नाही. अर्थातच, क्रीमीलेयर हे आरक्षणविरोधकांचं षडयंत्र आहे. मंडलच्या शिफारशीनुसार ओबीसींना आरक्षण मिळण्याची शक्यता दाट होऊ लागली असता आरक्षणविरोधक उच्चजातीय ओबीसीद्वेष्ट्यांनी सुप्रीम कोर्टात केस टाकल्यावर (आणि सर्वोच्च न्यायालयात ओबीसीचा एकही न्यायाधीश नसल्याने) त्या निकालात क्रिमीलेयरची अट घालण्यात आली. परिणामतः ओबीसीमध्ये आर्थिक आधारावर फूट पडली, पाडली गेली. आर्थिक संपन्न ओबीसींना आरक्षण लाभापासून दूर ठेवण्यासाठी ही शक्कल होती. जे ओबीसी उच्च शिक्षण आणि प्रशासनातील महत्वाच्या उच्चपदासाठी सक्षम होते त्या ओबीसींना क्रिमीलेयरची कात्री लागली. उच्च शिक्षण, प्रवेश पात्रता परीक्षा, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती, इ. ठिकाणी आडकाठी आणून ओबीसींना मज्जाव करण्यात आला. त्यामुळेच आजही सचिवालय, केंद्र सरकार, राज्य सरकार, राज्यपाल, राष्ट्रपती, संसद, विधीमंडळ, मंत्रालय, जिल्हाधिकारी, शासकीय विभागप्रमुख, आयुक्त, मुख्याधिकारी, जज्ज, विद्यापीठाचे कुलगुरु येथे ओबीसी औषधालाही सापडेना! अशी वस्तुस्थिती अनेकदा अनेकजण विश्वसनीय पुरावे, संदर्भ देऊन समोर आणत असतात. याठिकाणी ओबीसी सारखीच अवस्था अनुसूचित जाती व जमातीची यांचीही आहे. ५२? ओबीसीच्या हक्काचा ५२? वाटा कुणी फस्त केला? अर्थात बड्या अधिकाऱ्यांमध्ये उच्चजातीयांचा बोलबाला आहे. त्यांच्या हाताखाली कनिष्ठ अधिकारी, कर्मचारी म्हणून अवर्णनीय जाच सहन करावा लागत असल्याचे अनेकदा कानी येत राहते. तरीही प्रचार उलट्या दिशेने होतो. अपप्रचारच तो. साप सोडून भुई थोपटण्याचा प्रकार, त्या अपप्रचाराचे बळी आपले ओबीसी. जातीव्यस्थेने पक्की केलेली ही मानसिकता, उच्चजातीयांची दहशत किती भयानक आहे हे यावरुन ध्यानात येईल. मागासपणाचे चटके बसत असताना एकिकडे आरक्षणाची निकड तर दुसरीकडे जातीगंड, मागासपणाचा न्यूनगंडही. सुरुवातीला आरक्षणविरोधी खेम्यात वापरल्या गेलेल्या अन् ओबीसीमध्ये नसलेल्या जातीही अलीकडे आरक्षणासाठी कासावीस झालेल्या आहेत. 'त्यांना मिळते तर आम्हाला का नाही?' अशा नकारात्मक वाटचालीतून आरंभलेला त्यांचा वारु उधळत आता 'असं कसं देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही' इथपर्यंत पोहचला आहे. ओबीसीमध्ये समावेश करुन आरक्षण मिळावे म्हणून आग्रही आहेत. ओबीसीत आल्यानंतर ईडब्ल्यूएस मध्ये कोणते लाभार्थी उरणार आहे? ईडब्ल्यूएस आरक्षण कोणासाठी कुरण म्हणून राहणार आहे? आणि असे आंदोलक व ओबीसी परस्परविरोधी असल्याचे चित्र दाखवले जाते आहे. त्यांना कोणाची फूस आहे? याचीही चर्चा होते आहे. ईडब्ल्यूएस आरक्षण बिनबोभाटपणे मिळाले. त्यासाठी कुणी कधी कुठे मोर्चे काढले? निघालेत? त्यांची लोकसंख्या किती? मोजली कधी? ईडब्ल्यूएस आरक्षण किती? कशावरुन दिले? सर्वांचा चेहरा दाखवणारा आरसा जातनिहाय जनगणना का केली जात नाही? ओबीसी विद्यार्थ्यासाठीचे वस्तीगृहाचे आश्वासन हवेतच कुठे विरले? असे प्रश्न ओबीसीच्या विचारपिठावर येऊन विलाप करणाऱ्या तथाकथित ओबीसी बांधवांनी उच्चजातीयांना का विचारु नये? आणि असं करण्याची ज्यांची बिशाद नाही त्यांना ओबीसीके अंगने तुम्हारा क्या काम है? असा सवाल विचारण्यासाठी ओबीसी आता सरसावल्याशिवाय राहत नाही, राहणार नाही!

**अनुज हुलके**

## ५१ व्या तालुका विज्ञान प्रदर्शनी मध्ये जि.प.शाळा वडेगाव येथील शिक्षक मनीष कोल्हे अव्वल




**वडेगाव:–** नुकतीच तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनी जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तिरोडा येथे दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनी पार पडली त्यामध्ये शिक्षक गटातून जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय वडेगाव येथील विज्ञान शिक्षक मनिष प्रल्हाद कोल्हे यांनी विज्ञान प्रदर्शनीत reflection of light phenomenon या विषयावर उत्कृष्ठ पद्धतीने सादरिकरन केले.

या सादरीकरणात निरीक्षकांनी शिक्षक गटातून प्रथम क्रमांक दिलेला आहे व जिल्हास्तरावर निवड झालेली आहे.त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य एस. पी. ठाकरे यांनी पुष्पगुच्छ देऊन विज्ञान शिक्षक मनिष कोल्हे सरांचे सत्कार करण्यात आले

यावेळी क्रीडा व्यवसाय मार्गदर्शक प्रीतेश भांडारकर, स्काऊट गाईड आयुक्त प्रदीप मेश्राम, एम एम पौलकर, जी डी कटरे, आर टी वानखेडे, व्हीं एस ईरले, संदीप शेंडे, नंदकिशोर सुसतकर, सुधीर भाजीपाले, व्ही एफ बीसेन, के जी पंधरे, एम एस कुथे ,संजय पटले, सुरेश डोंगरे, विनोद सयाम, व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा?यांनी सरांचे स्वागत करून जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## मुख्याध्यापक बी.डब्लु.कटरे यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार

**गोंदिया:–** गोंदिया जिल्हा मुख्याध्यापक संघाचे माजी कार्यवाह तथा वर्तमान मार्गदर्शक, गोरेगांव तालुका खाजगी अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सह.पत संस्था गोरेगांव चे अध्यक्ष, मुख्याध्यापक बी.डब्लु. कटरे परशुराम विद्यालय मोहगांव हे ता.३०नोव्हेंबर रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेत.

आदरणीय सरांचा सेवानिवृत्तीपर सत्कार परशुराम शिक्षण प्रसारक संस्था गोरेगांव च्या वतिने संस्थेचे सचिव तथा माजी खासदार/आमदार डॉ.खुशाल बोपचे व अध्यक्ष तथा रॉ.का.नेते रविकांत बोपचे यांच्या हस्ते,व गोंदिया जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतिने माजी कार्यवाह से.नि.प्राचार्य खुशाल कटरे व मुख्याध्यापक एस.बी.पटले यांच्या हस्ते, परशुराम विद्यालय मोहगाव बु.येथे करण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक स.शि.श्रीमती भारती कटरे यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन स.शि.व्ही.एस. मेश्राम तर आभार प्रदर्शन स.शि.टी.एफ .ईळपाचे यांनी केले.

या प्रसंगी परशुराम विद्यालय मोहगाव बु.येथील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा येथील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक व शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. जि.प.गोंदियाच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख व प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.महेंद्र गजभिये यांच्या हस्ते त्यांच्या दालनात बी.डब्लु.कटरे यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी श्री.दिघोरे व शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## नगर पंचायत अर्जुनी
### ता. अर्जुनी मोर, जिल्हा गोंदिया

Emai Id-npmorgaon@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७१९६-२९५११९
क्र.नपअ बी/वि/जा./९६६/२०२३ दिनांक ०५/१२/२०२३

### जाहिर आवाहन

नगर पंचायत अर्जुनी हद्दीतील सर्व नागरिकांना, वाणिज्य संस्था, जाहिरात संस्था, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष यांना आवाहन करण्यात येते की, मा. उच्च न्यायालयीन प्रकरण PII १५५/२०२१ अनधिकृत जाहीराती घोषणा फलक, होर्डिग्स बाबत जनहित याचिका दाखल आहे. शहरातील नागरिकांना, वाणिज्य संस्था,जाहिरात संस्था, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष यांनी नगरपरिषद हद्दीतील कोणत्याही प्रकारचे अनधिकृत जाहिरात फलक होर्डिग्स पोस्टर्स इ. उभारण्यात येवू नये. प्रथम दर्शनी अनधिकृत जाहिरात उभारण्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेकडून योग्य ती शास्ती वसूल करुन मालमत्ता विरुषण प्रतिबंधात्मक कयदा १९९५ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(राजू घोडके)**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत अर्जुनी**

## कार्यालय ग्रामपंचायत गौरनगर
**पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया**

### निविदा सुचना

सर्व इच्छुक कंत्राटदाराना सुचित करण्यात येत आहे कि ग्रामपंचायत गौरनगर ला खालील विवरण पत्राप्रमाणे संपूर्ण कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात येते आहे. सदर कामाकरिता बांधकाम विभागाकडे तथा योग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून मोहरबंद लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत भवन, अंगणवाडी व सार्वजनिक शौचालय मध्ये पाणी टाकी व पाईप लाईनची व्यवस्था करणे. | ४८१२७७/- | ५००/- | ४८१३/- | ३ महिने |

१) वरील कामांचे निविदा फार्म दिनांक ०४/१२/२०२३ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.११/१२/२०२३ ला दुपारी ०३.०० वाजे पर्यंत (सुट्टी दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय गौरनगर येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल. २) सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह दिनांक ०४/१२/२०२३ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.११/१२/२०२३ ला दुपारी ०३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येईल, तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा लगतच्या मासिक सभेत ग्रामपंचायत गौरनगर येथे उघडण्यात येईल. ४) सदर कामाचा तपशीलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

**उपसरपंच**
**ग्रामपंचायत गौरनगर**

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत गौरनगर**

## इमारती झाल्या खंडर, साहित्याची केली चोरी
**कलपाथरी मध्यम प्रकल्पाची व्यथा: देखभाल दुरुस्तीकडेही दुर्लक्ष**



**गोंदिया:** गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी मध्यम प्रकल्पाच्या देखरेखीकडे गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्ष झाले. त्यामुळे प्रकल्पानजीक असलेल्या प्रकल्पाच्या इमारतींची प्रचंड नासधुस झाली. ठिकठिकाणी इमारतींना भेगा पडल्या असून साहित्य देखील चोरीला गेले आहे. देखरेख करणारा कुणीही नसल्यामुळे इमारती खंडर झाल्या आहेत. या प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याची देखील दुरवस्था झाली आहे.

कलपाथरी मध्यम प्रकल्पाला तयार होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला आहे. प्रशासनाच्यावतीने याकरिता कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला. विविध सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या. अभियंता व कर्मचाऱ्यांकरिता इमारती तयार करण्यात आल्या. परंतु आजघडीला या इमारतीत कुणीही राहत नाही. ज्यामुळे आता हे इमारती खंडहर बनल्या आहेत. इमारतीतील खिडक्या, दरवाजे, प्लोरिंग, इलेक्ट्रीक सामान पूर्णत: जर्जर झाल्या आहेत. तर गोदामातील टिनाचे ताडपत्री गायब झाली असून ती चोरीला गेल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. मागील दहा वर्षात एकदाही या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. रस्त्याचे अंतर जवळपास दीड किलोमीटर आहे. या रस्त्याचे घुमर्रा, तेलनखेडी, कलपात्री येथील नागरिक व विद्यार्थी ये-जा करतात. मात्र खराब रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे.

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
### (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
### कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया

**(ई मेल** gidgondiasdb@rediffmail.com **दुरध्वनी क्र.०७१८२-२३७०७७**

### ई-निविदा सुचना क्र.०६/गोपावि/२०२३-२४

कार्यकारी अभियंता, गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया ता.जि.गोंदिया ह्यांचे कार्यालयाकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatender.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच संपूर्ण निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रू. | इसारा/बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संघाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग/पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Estimate of Cleanning grass Removing Silt and Repairing Outlets@RD 0m to 2000m of main canal of chulband Medium Project at Village Murdoli Tah.Goregaon Distt.Gondia | रू.७,९१,९८३/- | ८,०००/- | रू.१,१८०/- (जीएसटीसह) | वर्ग-७ व त्यावरील | ६ महिने |
| २ | Construction of Guide wall from RD 75 m to 100 of Main Canal of Chulband Medium Project at village Murdoli Tah.Goregaon Distt.Gondia | रू.७,३९,८७३/- | ७,५००/- | रू.१,१८०/- (जीएसटीसह) | वर्ग-७ व त्यावरील | ६ महिने |

**अ) निविदा विक्री कालावधी :- ०१.१२.२०२३ ते दि.११.१२.२०२३ वेळ १४.०० वाजे पर्यंत**
**ब) निविदा सादर करण्याचा शेवट चा दिनांक :-११.१२.२०२३ वेळ १४.०० वाजे पर्यंत**
**क)** Geo Tagging **करण्याकरिता कामाचे ठिकाणी भेट देण्याचा :- दि.०४.१२.२०२३ ते दि.०८.१२.२०२३**
**ड) निविदा उघडण्याचा कालावधी :-दि.१२.१२.२०२३ वेळ १५.०० वाजेपासून**
**(सदर निविदे सुचनेत काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**

१) कंत्राटदाराने Geo Tagging Certificate क्र.१ मधून सादर/Upload करने अनिवार्य आहे. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
२) निविदा मागविणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी कंत्राटदारांची क्षेत्रीय भेट प्रभावी असावी यासाठी कार्यस्थळाचा भेटीसाठी किमान ३ जिओऑगिंग साईटचे स्थान निश्चित केले आहे.
३) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई-निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
४) सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक टेन्डर management https://mahatender,gov,in तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीसबोर्डवर पहावयास मिळेल.
५) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाशे ई-कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जवाबदार राहतील आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे (Claims) निविदाकारास देय राहणार नाही.
६) उपरोक्त कामाची दोष निवारण कालावधी ५ वर्ष राहील.

**(एस.एस.सोनुले)**
कार्यकारी अभियंता
गोंदिया पाटबंधारे विभाग गोंदिया

## महापरिनिर्वाण दिन निमित्त "बुद्ध-भीम" गितांमार्फत वाहण्यात आली आदरांजली

**गोरेगाव :** युगपुरुष परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध वनकर यांच्या आवाजात ङ्गबुद्ध- भीमङ्ग गितांमाफ 'त आदरांजली वाहण्यात आली. बहुजन हिताय बहुजन सुखाय, बौद्ध विहार, तुमसर, ता. गोरेगाव येथे राजकुमार बडोले मित्र परिवार व योगेश्वर बहुउद्देशिय शिक्षण संस्था नागपूर यांच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन येथे करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी आपले जीवन समर्पित केले. अनेक कठीण परिस्तिथीचा सामना करत उच्च शिक्षण प्राप्त केले. समाज मागास राहू नये म्हणून समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपल्या जीवाचे रान केले आणि आपल्या अंतिम श्वासापर्यंत समाजासाठी कार्य करीत राहिले असे बडोले म्हणाले.

## ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी
### पंचायत समिती गोरेगांव जिल्हा परिषद गोंदिया
### जाहिर निविदा सुचना पहिली वेळ सन २०२३-२४

दिनांक :-०३/१२/२०२३

ह्या सुचनाद्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी येथे स्वच्छ भारत मिशन टप्पा २ व तंटा मुक्त समिती पुरस्कार निधी या योजने अंतर्गत खालिल विवरणाप्रमाणे बांधकाम करण्याकरीता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने बि-१ पद्धतीने नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी निविदा अर्ज ग्रामपंचायत येथे दिनांक ०४/१२/२०२३ ते ०८/१२/२०२३ पर्यंत विक्री करीता उपलब्ध आहेत. नमूद केल्याप्रमाणे अटि व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीसच्या दिनांकापासून ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक ०८/१२/२०२३ ला दुपारी ठिक ३.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

सदर निविदा हि दिनांक ११/१२/२०२३ ला शक्य झाल्यास सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजीत रक्कम | नमुना निविदा फार्मची किंमत | निविदासोबत भरावयाची अनामत रक्कम १% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत निधी अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे | ३०००००/- | ५००/- | ३०००/- | ३ महिने | योग्य ते वर्गवारीत | |
| २ | तंटा मुक्त पुरस्कार निधी अंतर्गत विशावा बांधकाम करणे | ६४५८९/- | ५००/- | १०००/- | ३ महिने | योग्य ते वर्गवारीत | |

निविदेसंदर्भातील सर्व अटि व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर पाहावयास मिळतील.

**श्री.एस.एम.गौतम**
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कुऱ्हाडी

**श्री.अनिल मडावी**
सरपंच
ग्रामपंचायत कुऱ्हाडी

## ग्राम पंचायत कारुटोला पं.स.सालेकसा जि.प.गोंदिया
### निविदा सुचना क्र. १( पहिली वेळ सन २०२३-२०२४)

जा.क्र.
दि.:-०५/१२/२०२३

सर्व इच्छुक कंत्राटदाराना सुचित करण्यात येत आहे कि ग्रामपंचायत कारुटोला येथे १५ व्या वित्त आयोग(पंचायत समिती स्तर)निधीतून विविध बांधकामाकरीता खालील विवरण पत्राप्रमाणे संपूर्ण कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात येते आहे. सदर कामाकरिता बांधकाम विभागाकडे तथा योग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून मोहरबंद लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.


| अ.क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | अंदाजित किंमत | निविदा व फॉर्मची किंमत | निविदेसोबत भरावयाची रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी महिने | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग (पं.स. स्तर) | शौचालय बांधकाम करणे (जि.प. शाळा कारुटोला) | २०००० | १०००/- | २०००/- | | वर्ग ९ व त्याखालील |
| २ | | अंगणवाडी दुरुस्ती कारुटोला | २०००० | १०००/- | २०००/- | | वर्ग ९ व त्याखालील |
| ३ | | सिमेंट रस्ता दुरुस्ती कारुटोला | १०००० | १०००/- | २०००/- | ३ महिने | वर्ग ९ व त्याखालील |
| ४ | | किचन शेड बांधकाम (जि.प.शाळा कारुटोला) | २०००० | १०००/- | २०००/- | | वर्ग ९ व त्याखालील |
| ५ | | आवारभिंतीला रंगरंगोटी करणे जि.प.शाळा हेटीटोला) | १५०००० | १०००/- | १५०० | | वर्ग ९ व त्याखालील |
| ६ | | नळयोजना करिता जाळी कंपाऊंड बांधकाम करणे | ४००००० | १०००/- | ४०००/- | | वर्ग ८ व त्याखालील |
| ७ | | आंगणवाडी इमारत रंगरंगोटी करणे | १००००० | १०००/- | १०००/- | | वर्ग ९ व त्याखालील |

| | |
|---|---|
| निविदा प्रकाशित दिनांक | दिनांक:-०५/१२/२०२३ |
| कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | दिनांक:-०६/१२/२०२३ सकाळी ११.०० वाजे पासून |
| निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक | दिनांक:-०६/०७/२०२३ पासून |
| निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक:- १३/१२/२०२३ दु.०३.०० वाजे (शक्य झाल्यास) |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक:-१३/१२/२०२३ दु.०३.०० वाजे (शक्य झाल्यास) |

(टिप:-निविदा पत्रकातील सविस्तर माहिती ग्राम पंचायत कार्यालय कारूटोला येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.)

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत कारूटोला**
**पं.स.सालेकसा जि.प.गोंदिया**

**सरपंच**
**ग्रामपंचायत कारूटोला**
**पं.स.सालेकसा जि.प.गोंदिया**

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.०६ डिसेंबर २०२३


# जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषद आपल्या गावी हे उपक्रम ठरणार माध्यम-जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले

*** सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा येथे अभियानाचा शुभारंभ * विविध विभागाच्या योजनांची स्टॉल्सच्या माध्यमातून केली जनजागृती**

**गोंदिया:** – जिल्हा परिषद म्हणजे ग्रामविकासाचे माध्यम आहे. ग्रामीण भागातील बहुतेक योजना ह्या जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविल्या जा–तात. त्यांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषद आपल्या गावी हे अभियान एक महत्वाचे माध्यम ठरणार, असा मला विश्वास असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले.




जिल्हा परिषद आपल्या गावी या उपक्रमाचे शुभारंभ कार्यक्रम सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा येथे ३० नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. यावेळी ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरुन मार्गदर्शन करताना बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजी. यशवंत गणवीर, जि. प. समाज कल्याण सभापती पूजा अखिलेश सेठ, पंचायत समिती सभापती संगीता खोब्रागडे, जि.प.सदस्य डॉ.भुमेश्वर पटले, जि. प. सदस्या कविता ताई रंगारी, जि. प.सदस्या सुधाताई रहांगडाले, जि.प.सदस्या चंद्रकला डोंगरवार, पं.स.उपसभापती शालिंदर कापगते, सरपंच योगेश्वरी चौधरी, पंचायत समिती सदस्य सर्वश्री डॉ. रुखिराम वाढई, प.स.सदस्य अल्लाउद्दीन राजानी, चेतन वडगाये, शिवाजी गहाने, जि.प. प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) गोविंद खामकर, गटविकास अधिकारी अजित पवार आदी उपस्थित होते. सुरुवातीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित अतिथी यांचे पर्यावरण तसेच स्वच्छते विषयक जाणीव व्हावी म्हणून लहान झाड व एक झाडू देऊन स्वागत करण्यात आले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मागील अनेक दिवसांपासून जनतेच्या समस्या जाणून त्यांची सोडवणूक कशी करायची यासाठी आपण प्रयत्नशील होतो. मात्र आता या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्हा परिषद क्षेत्रात आपण जिल्हा परिषदेच्या योजना पोहोचवून समस्या निराकरणासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर यांनी प्रास्ताविकातून जिल्हा परिषद आपल्या गावी या उपक्रमा विषयक माहिती दिली. सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी गावातील अडीअडचणी वरिष्ठांच्या लक्षात आणून देत त्या सोडविण्याची मागणी केली. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी मार्गदर्शन करताना लाभार्थ्यांनी स्वतः मागणी करून त्याची अंमलबजावणी केली तर कोणतीही योजना निश्चितच यशस्वी झाल्याशिवाय राहणार नसल्याचे सांगत नागरिकांनी वेळेवर कराचा भरणा करावा, असे आवाहन केले.

जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजी. यशवंत गणवीर यांनी जिल्हा परिषद आपल्या गावी हे उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगितले. यावेळी समाज कल्याण सभापती पूजा अखिलेश सेठ, प. स. सभापती संगीता ताई खोब्रागडे, जिल्हा परिषद सदस्य डॉ.भूमेश्वर पटले, यांनीही समयोचीत मार्गदर्शन केले. सुरुवातीला विकसित भारत संकल्प यात्रेला भेट देण्यात आली. यावेळी महिला व बालकल्याण विभाग, स्वच्छ भारत मिशन, जल जीवन मिशन, कृषी विभाग, पशू संवर्धन विभाग, घरकुल विभाग, उमेद अभियान, जिल्हा समाजकल्याण विभाग, समग्र शिक्षा अभियान, सेतू केंद्र, आधार नूतनीकरण, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग देवरी, महाराष्ट्र राज्य वीज वितरण, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, लघु पाटबंधारे विभागाच्या वतीने स्टॉल्स लावण्यात आले होते.

आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला व बालकल्याण विभाग सडक अर्जुनीच्या वतीने माझी कन्या भाग्यश्री योजना अंतर्गत काव्या सुरेश मरस्कोल्हे, अश्विनी सुरेश मरस्कोल्हे, अन्वी धर्मेंद्र अंबुले, हिरण्या नरेंद्र मेंढे, यशश्री हुपेंद्र खोटेले, दर्शिका दुर्गेश कुरसुंगे, छनक ओमराज डोये, नायरा विजय उदापुरे, दीक्षा विजय उदापुरे, काव्या दुयीधन नेवारे, नित्या गणराज रहांगडाले, जान्वी संजय देशमुख, वृषाली प्रशांत मेंढे, रिया प्रशांत मेंढे यांना उपस्थितांच्या हस्ते मुदत ठेव धनादेश वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे कृषी विभागाच्या वतीने ड्रोन फवारणी यंत्राचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद गोंदियाचे सर्व विभाग प्रमुख तसेच सडक अर्जुनी तालुक्यातील सर्व अधिकारी कर्मचारी हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामसेवक मुनेश्वर व अतुल गजभिये यांनी तर आभारप्रदर्शन गटविकास अधिकारी अजित पवार यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहायक गटविकास अधिकारी दिलीप खोटेले, पंचायत विभागाचे पंकज पटेल, पाणी व स्वच्छता विभागाचे भागचंद्र रहांगडाले यांच्यासह ग्रामपंचायत डव्वा येथील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वन्यप्राण्यांची संख्या घटली, बाराशे पाळीव जनावरे भक्षस्थानी पडली

**गोंदिया:** वाघ आहे तिथे जंगल आहे. जंगल आहे तिथे पाणी आहे आणि पाणी आहे तिथे जीवन आहे.हे चक्र निसर्ग सृष्टीत सुरु असताना आता निसर्गाचा समतोल ढासळू लागला आहे. वनातील झालेली मोठ्या प्रमाणात कत्तल आणि वन जमिनीवर होत असलेले अतिक्रमण ही वन्यप्राण्यांना गावाकडेच धाव घ्यायला लावत आहे. मनुष्य आणि प्राणी समोरासमोर आले तर एकमेकांवर हल्ला करणार, हे निश्चितच आहे. मागील सहा वर्षात गोंदिया जिल्ह्यातील वन्यप्राण्यांनी पाळीव प्राण्यांवर हल्ला करुन ११६८ जनावरांना ठार केले.

गोंदिया जिल्हा वनाच्छादित असून गोंदिया जिल्ह्यात २ लाख ५६ हजार ४०० हेक्टर वनभुमी आहे. या वनातील वन्यप्राण्यांची संख्या दिवसेंदिवस घटू लागली आहे. जंगलातील वन्यप्राणी स्वत:ला असुरक्षीत समजू लागल्याने ते सैरावैरा पळत आहेत. मानवाचा जंगलात हस्तक्षेप वाढल्याने वन्यप्राणी गावाकडे धाव घेत आहेत. यातच मागील पाच वर्षात गोंदिया जिल्ह्यातील वन्यप्राण्यांनी १९६८ जनावरांना ठार केले आहे.



**वन्यप्राण्याच्या हल्ल्यात ठार झालेली जनावरे व जनावरांच्या मालकांना देण्यात आलेली मदत वर्षनिहाय**

| सन | मृत जनावरांची संख्या | मिळालेली मदत (लाखात) |
|---|---|---|
| २०१७–१८ | १३४ | १०.२९ |
| २०१८–१९ | १८४ | १४.१२ |
| २०१९–२० | १७५ | १५.९ |
| २०२०–२१ | २४१ | १६.६२ |
| २०२१–२२ | २७५ | २५.३३ |
| २०२२–२३ | १५९ | १३.७७ |

## ३ कोटी ९४ हजारांची मदत

**गोंदिया जिल्ह्यातील वन्यप्राण्यांमुळे चार जणांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबियांना ८५ लाख, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जमी झालेल्या ४६ जणांना ६० लाख ११ हजार ७४० रूपये, १८५ जनावरांच्या मृत्यूप्रकरणी १५ लाख ७४ हजार २० रुपये, तर शेतपिकाच्या २ हजार ४३१ प्रकरणात १ कोटी ४० लाख ८ हजार ९३० रुपये असे एकूण २ हजार ६६५ प्रकरणात ३ कोटी ९४ हजार ६९० रुपये देण्यात येणार आहेत.**

## ९४ लाखांची मदत

**मागील सहा वर्षात वन्यप्राण्यांनी १९६८ जनावरांना ठार केले. त्या जनावरांच्या मालकांना नुकसान भरपाई म्हणून ९४ लाख रुपये देण्यात आले आहे. काहींनी मदतीसाठी अर्ज पाठविले आहेत.**

### २४३१ शेतकऱ्यांच्या शेतपिकाचे नुकसान

गोंदिया जिल्हा वनाच्छादित असल्याने सन २०२३–२४ या वर्षात शेतपिकांचे नुकसान झालेल्या २ हजार ४३१ शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान झाले. वनविभागाने नुकसानभरपाई द्यावी म्हणून २ हजार ४३१ शेतकऱ्यांनी वनविभागाला अर्ज केले आहे. त्या शेतकऱ्यांना १ कोटी ९३० रुपये नुकसान भरपाई लवकरच देण्यात येणार आहे.

# पंचनामे करुन वर्ष लोटले, तरी २२२ गावांना मदतीची प्रतीक्षाच; आपत्तीग्रस्तांमध्ये संताप

**गोंदिया:** गोंदिया जिल्ह्यात मागील वर्षी ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यातील शेकडो घरांची पडझड झाली होती. दरम्यान, नुकसान भरुन काढण्यासाठी संबंधित विभागाच्या माध्यमातून नुकसानीचे पंचनामे करण्यात आले. यात जिल्ह्यातील २२२ गावातील घर, गोठ्यांची पडझड झाल्याची नोंद करुन तसा अहवाल शासनाला पाठविण्यात आला. मात्र, शासनाकडून या आपत्ती ग्रस्तांकडे दुर्लक्ष होत असून केलेला पंचनामा केवळ देखावा ठरू लागला आहे. पंचामाना करुन वर्ष लोटत असताना आतापर्यंत एकाही आपत्तीग्रस्ताला नुकसानभरपाई मिळाली नाही. त्यामुळे आपत्तीग्रस्तांमध्ये शासनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मागील वर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला अपेक्षित असा पाऊस झाला नाही. विशेष म्हणजे, पावसाचे महत्त्वाचे नक्षत्र कोरडे गेले. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली. विशेष म्हणजे, पावसाचा जुलै महिना अर्धा–अधिक कोरडा गेला. मात्र, ऑगस्ट आणि ऑक्टोबर महिन्यात दमदार पावसाने हजेरी लावली होती. यावेळी संपूर्ण जिल्ह्यात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली होती. या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक घरांची पडझड झाली. ज्यात घरे आणि जनावरांचे गोठे जमीदोस्त झाले.

दरम्यान, नुकसान भरपाईसाठी शासनाने पंचनामा सुरू केला. यावेळी जिल्ह्यातील २२२ गावांतील नागरिकांच्या घरांचे व पशुधनाच्या शेडचे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली. तर या आपत्तीगस्तांना नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी जिल्हा प्रशासनाकडून तसा प्रस्तावही शासनाकडे सादर करण्यात आला. मात्र, आजतागायत एक दमडीही आपत्ती ग्रस्तांच्या खात्यावर जमा करण्यात आली नाही. त्यामुळे शासनाचे या २२२ गावातील आपत्तीग्रस्तांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र असून शासनाच्या या वेळकाढू धोरणामुळे आपत्तीग्रस्तांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.

## जिल्ह्यातील तालुकानिहाय गावांचा समावेश

**गतवर्षीच्या पावसात २२२ गावात नुकसानीची नोंद केली असता त्यात गोंदिया तालुक्यातील ८ गावांचा समावेश असून आमगाव तालुक्यातील ११, सालेकसा ११, देवरी ७७, अर्जुनी मोरगाव ३४, सडक अर्जुनी २९, तिरोडा ३६, व गोरेगाव तालुक्यातील ३६ गावांचा समावेश आहे.**

**२०२२ च्या ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक घरांचे नुकसान झाले. नुकसान भरून काढण्यासाठी पंचनामा अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे. पण त्याचा अद्याप पर्यत निधी मिळालेला नाही. निधी मिळताच नुकसानभरपाईची रक्कम पीडितांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.**

**–राजन चौबे,** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, गोंदिया

# ६० टक्के तलाव पावसावर विसंबून; मालगुजारी तलावांचे अस्तित्व धोक्यात

**गोंदिया:** जलसंकटातून मुक्त होण्यासाठी राज्यात विविध अभियान राबविले जात आहे. तर दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाच्या नियंत्रणात असलेल्या काही जुन्या तलावांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. कधीकाळी बाराही महिने भरुन राहणारे तलाव आता केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. केवळ दोन मालगुजारी तलावांना सोडले तर कोणत्याही तलावांत ०.५ दलघमीपेक्षा जास्त पाणी नाही.

जिल्ह्यात १०० वर्षे जुने मालगुजारी तलाव आहेत.त्यामुळेच हा जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. तलाव मातीने भरण्यासोबतच अतिक्रमणाच्या समस्येमुळे या प्राचीन वारशांचे अस्तित्व संकटात दिसून येत आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या कायम वादग्रस्त राहिलेल्या या विभागाकडून त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही.



**सिंचन विभागाच्या तलावांची स्थिती**

| तलाव | संख्या | उपयुक्त पाणी (दलघमी) | पाण्याची टक्केवारी |
|---|---|---|---|
| मोठे तलाव- | ४ | १६४.०३ | ३२.२१ |
| मालगुजारी | ३८ | ९.४६० | ३८.९० |
| मध्यम प्रकल्प | १० | ३७.६७८ | ३५.१६ |
| लघु प्रकल्प | २० | २७.०१ | १९.२८ |
| स्थानिक तलाव | ३ | ०.०० | ०.०० |

जिल्ह्यात सहा हजार ९०५ तलाव, बांध आहेत. एकुण जलक्षेत्र २१ हजार ५०१ हेक्टर आहे. सिंचन विभागाच्या ६८ तलावांचे जलक्षेत्र ११ हजार हेक्टरच्या जवळपास आहे. तर जिल्हा परिषदेच्या १०८७ तलावांचे जलक्षेत्र ४६५४ हेक्टर आहे. याशिवाय ८८ खासगी व ५ बचत गटांचे तलाव आहेत. जिल्हा परिषदेकडून लक्ष देण्यात न आल्यामुळे तलावांचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. बांध तसेच तलाव एकतर मातीने भरण्यात आले. अतिक्रमण करण्यात आले किंवा वाळलेले आहेत. जिल्ह्याच्या अनेक तालुक्यांमधील बोडी व तलाव मातीने बुजवून सपाट करण्यात आले. यानंतर तेथे प्लॉट पाडून त्यांची विक्रीसुद्धा करण्यात आली.

त्यावर आता अनेक मनवी वसाहती तयार झाल्या असून मोठमोठ्या इमारती मोठ्या दिमाखात उभ्या आहेत. मागील २० वर्षापुर्वी तिरोडा शहरात असणारे दोन तलाव असेच गायब झाले. त्यावर आता मोठ्या इमारती उभ्या असून नागरी वसाहती आहेत. तलाव लुप्त होण्यामागील हे सुद्धा एक प्रमुख कारण आहे.

## वाढतेय अतिक्रमण

**प्राचीन मालगुजारी तलावांकडे लक्ष न दिल्यामुळे तलावांची जलक्षमता कमी झाली आहे. माती भरल्यामुळे खोली कमी झाली आहे. जिल्ह्यात जवळपास ६० टक्के तलाव असे आहेत, जे पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर विसंबून आहेत. अनेक तलाव तर पूर्णत: बुजून गेले व त्यांच्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. अशीच स्थिती राहिली तर पुढील काही वर्षात मालगुजारी तलावांचे अस्तित्व नष्ट होईल.**

## कृषी व मत्स्य व्यवसाय होणार प्रभावित

**घटणारे बांध व कमी होणाा जलस्तर यांचा प्रभाव मत्स्यपालन व शेतीवरसुद्धा होईल, मात्र मत्स्यपालन विभागाने मत्स्य उत्पादनावर कोणत्याही प्रकारचा परिणाम न होण्याचा दावा केला आहे. त्यांच्या म्हण्यानुसार लहान तलावांतून होणाऱ्या मत्स्य व्यवसायची भरपाई मोठ्या जलाशयातून करता येऊ शकते. तसेच कृषी विभागाद्वारे यावर्षी रब्बी पिकांसाठी ५१ हजार ५०० हेक्टर क्षेत्र प्रस्तावित आहे. परंतु बांधांमध्ये जेव्हा अपेक्षित पाणी नसेल तर पिकांना भरपूर पाणी मिळणे शक्य नाही. अशात यावर्षी रब्बी पिकांच्या उत्पादनातही घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

## ५ ते ७ जानेवारी दरम्यान दुसरे पक्षी सर्व्हेक्षण

**गोंदिया :** नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रामध्ये विविध अधिवासामध्ये राहणाऱ्या विविध पक्ष्यांच्या प्रजातींचे अन्वेषण व दस्तऐवजीकरण तसेच पक्षी विविधतेचा सर्व समावेशक अभ्यास करण्याकरीता दिनांक ५, ६ व ७ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये दुसरे पक्षी सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.


सदर पक्षी सर्व्हेक्षणात सहभागी होवू इच्छिणाऱ्या पक्षीप्रेमींचे दिनांक ६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० पासून ते १६ डिसेंबर २०२३ रोजी रात्री १० वाजतापर्यंत फक्त ५० जागेकरीता अर्ज स्विकारण्यात येतील व प्रति व्यक्ती १६०० रुपये याप्रमाणे फी आकारण्यात येईल.

# गोंदिया जिल्ह्यात २० वर्षांत ३ हजारांवर "एड्स' ग्रस्तांची नोंद

**गोंदिया:–** एचआयव्ही एड्स एक प्रकारची धास्ती मनात घर करुन जाते. या आजाराबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली असली तरी या जीवघेण्या आजाराने जगभरात आपले पाय पसरले आहे. दरम्यान, आयसीटिसी विभागाच्या नोंदीनुसार गोंदिया जिल्ह्यातही या आजाराने ग्रस्त असलेल्यांची संख्या बऱ्यापैकी असून मागील २० वर्षात जिल्ह्यात ३ हजाराच्या वर एड्स या आजाराने ग्रस्त असलेल्यांची नोंद आहे. सद्यास्थिती जिल्ह्यात १८५२ एड्स आजाराने पीडित उपचार घेत आहेत. जगभर पसरलेल्या एड्स या जीवघेण्या आजारबद्दल जगभर जनजागृती व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केल्यानुसार दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो.

## पाच वर्षात ४७७ जणांचा मृत्यू

**या जीवघेण्या आजारापासून जिल्ह्यातही शेकडो जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. गेल्या पाच वर्षात म्हणजेच २०१८ या वर्षीपासून ४७७ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. यात २०१८–१९ या वर्षी १९९ जणांच्या मृत्यूची नोंद केली आहे. तर २०१९–२० या वर्षात १००, त्याचबरोबर २०२०–२१ यावषी ४८, २०२१–२२ ला ७५, २०२२–२३ या मगील वर्षात ८५ तर २०२३–२४ या चालू वर्षात ५० एड्स पीडितांचा जीव गेला आहे.**



गोंदिया जिल्ह्यातही या दिनाच्या निमित्ताने आरोग्य विभाग व आयसीटीसी केंद्राच्या माध्यमातून जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असतात. यंदाही १ डिसेंबर रोजी जिल्हास्तरावर निबंध व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करुन जनजागृती करण्यात येत आहे. दरम्यान, जिल्ह्यात एड्स या आजाराने ग्रस्त असलेल्यांचा आढावा घेतला असता २००२ या वर्षीपासून जिल्ह्यात एड्स तपासणीला सुरुवात करण्यात आली. यामध्ये आतापर्यंत ३ हजार ७६ एड्स ग्रस्तांची नोंद केली आहे. आजघडीला जिल्ह्यात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र, २ ग्रामीण रुग्णालय २ शासकीय जिल्हा रुग्णालय व खासगी असे ५८ तपासणी केंद्र स्थापन करण्यात आले असून २०१० यावर्षीपासून जिल्ह्यात एआरटी उपचार सुरू झाले आहे. दरम्यान, १८५२ पीडित हा उपचार घेत आहेत. एड्स आजाराबाबत अनेक जन अद्यापही अनभिज्ञ आहे. त्यासाठी जागरुक असणे आवश्यक आहे.

**"जिल्ह्यात यावषी २४ हजार ५५६ जणांची तपासणी केली असून त्यापैकी ५० संक्रमित आढळले आहे. तर १२ हजार २२ गरोदर मातांची तपासणी केली असता एक महिला एड्स आजाराने ग्रस्त असल्याचे निष्पन्न झाले. एड्स हा जीवघेणा आजार असला तरी नियमित औषधी व पुरावे व्यायाम आदीने सर्वसामान्य जीवन जगता येते. तेव्हा घाबरुन न जाता वैद्यकीय सल्ला घ्यावा. त्याचबरोबर प्रत्येकांनी जवळच्या आयसीटीसी केंद्रात विशेषतः गरोदर मातांनी निरोगी बाळाच्या जन्मासाठी तपासणी करून घ्यावी."**

**– संजय जेनेकर,** जिल्हा पर्यवेक्षक, केटीएस जिल्हा रुग्णालय, गोंदिया.

# ३०० राईस मिलची चाके थांबली, अर्थचक्र बिघडले

## ५० हजार मजुरांचा रोजगार हिरावला: दोन महिन्यापासून निर्यातबंदी, जिल्ह्याचे वैभव हरवतेय



**गोंदिया:** जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषीवर आधारित आहे. धान या भागातील मुख्य पीक असल्याने त्यावर आधारित अरवा आणि उष्णा अशा ३०० वर राईस मिल जिल्ह्यात आहे. यातून जवळपास ५० हजारांवर मजुरांना रोजगार मिळतो. तर येथील तांदुळ देशविदेशात मोठ्या प्रमाणात पाठविला जातो. त्यामुळे यावर आधारित राईस मिल उद्योग देखील मोठ्या प्रमाणात आहे. पण यंदा ऑगस्ट महिन्यात केंद्र सरकारने नान बासमती (अरवा) तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली, तर उष्णा तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क आकारले. त्यामुळे तांदळाची निर्यात मागील काही महिन्यांपासून बंद झाल्याने जिल्ह्यातील ३०० राईस मिलची चाके थांबली असून अर्थचक्र बिघडल्याचे चित्र आहे.

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या पाच जिल्ह्यांत प्रामुख्याने धानाची १५ हजार हेक्टरवर धानाची लागवड केली जाते. या भागात उत्पादित होणाऱ्या तांदळाचा दर्जा चांगला असल्याने त्याला देश आणि विदेशात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. बासमती, नानबासमती, उष्णा तांदूळ, ब्राऊन राईस या सर्व तांदळाची दरवर्षी १९८ लाख मेट्रीक टन तांदळाची निर्यात या भागातून केली जाते. त्यामुळे यावर आधारित राईस मिल उद्योग या भागात मोठ्या प्रमाणात आहे. पूर्व विदर्भात एकुण ७८९ राईस मिल असून यावर उद्योगातून जवळपास ७० हजार लोकांना रोजगार मिळतो. तसेच याच उद्योगावर प्रामुख्याने या भागातील अर्थचक्र चालते.

**तांदळाची विदेशात होणारी निर्यात**

| तांदुळ | होणारी निर्यात |
|---|---|
| बासमती | ४७ लाख मेट्रीक टन |
| उष्णा तांदूळ | ८० लाख मेट्रीक टन |
| अरवा तांदुळ | ६५ मेट्रीक टन |
| ब्राऊन तांदुळ | ५ मेट्रीक टन |

शासनाच्या धोरणामुळे मागील काही वर्षापासून हा उद्योग आधीच डबघाईस असला आहे. त्यातच आता सप्टेंबर महिन्यापासून शासनाने अरवा तांदळावर निर्यातबंदी आणि उष्णा तांदळावर २० टक्के निर्यात शुल्क लावल्याने तांदळाची निर्यात पूर्णपणे बंद झाली आहे. त्यामुळे मागील दोन महिन्यांपासून राईस मिलची चाके थांबल्याने ७० हजारावर मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. तर राईस मिल उद्योग डबघाईस आल्याने त्यांच्यावर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. केंद्र या धोरणात अद्यापही कुठलीही सुधारणा केली नाही. त्यामुळे राईस मिल उद्योगाचे अर्थचक्र बिघडले असून याचा परिणाम तांदळाच्या दरावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## तांदुळ अतिरिक्त झाल्याने दरावर परिणाम

**भारतीय खाद्य महामंडळाकडे सध्या स्थितीत ४०० लाख मेट्रीक टन तांदुळ शिल्लक आहे. तर सन २०२३–२४ या हंगामातील १०८० मेट्रीक टन तांदुळ पुन्हा जमा होणार आहे.त्यामुळे तांदळाचा अतिरिक्त स्टॉक होण्याची शक्यता आहे. तर ७० टक्के तांदुळ सरकार स्वस्त धान्य दुकानातून माफक दरात उपलब्ध करुन देते. त्यामुळे तांदळाचे दर वाढण्याची शक्यता कमी आहे. तांदळाच्या निर्यातीवर बंदी असल्याने तांदळाच्या दरवाढीवर परिणाम होण्याची शक्यता राईस मिल उद्योजकांनी वर्तविली आहे.**

## या उपाययोजना केल्या तरच सुधारणा

**केंद्र सरकारने तांदळावरील निर्यातीबंदी त्वरित हटवावी, उष्णा तांदळावरील २० टक्के निर्यातीवर त्वरित रद्द करावा, ५० डॉलर प्रतिटन असा फिक्स निर्यात कर लागू करावा, तांदळाची निर्यातबंदी अधिक काळ बंद राहिल्यास विदेशी देश भारताऐवजी दुसऱ्या देशातून तांदूळ खरेदी करतील, याचा नेहमीसाठी येथील उद्योगावर परिणाम होईल. त्यामुळे केंद्र सरकारने यावर त्वरित निर्णय घेऊन सुधारणा करण्याची गरज आहे.**

**केंद्र सरकारने २३ ऑगस्टपासून उष्षा तांदळावर २० टक्के निर्यातकर आणि अरवा तांदळावर निर्यातबंदी लागू केली आहे. त्यामुळे निर्यात पूर्णपणे थांबल्याने मागील दोन महिन्यांपासून राईस मिल पूर्णपणे बंद आहेत. त्यामुळे ७० हजारांवर मजुरांचा रोजगार हिरावला आहे. तर राईस मिल उद्योग डबघाईस आला आहे. केंद्र सरकारने निर्यातबंदी त्वरित मागे घेण्याची गरज आहे.**

**अशोक अग्रवाल,** अध्यक्ष, विदर्भ राईस मिल असोसिएशन

# मग्रारोहयो योजनेचा लाभ प्रत्येक गरजूंना मिळेल असे नियोजन करा-आ.विजय रहांगडाले

**तिरोडा:–** महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनाअंतर्गत केंद्र सरकार ग्रामीण कुटुंबातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला प्रति कुटुंब १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देते. महाराष्ट्र सरकार १०० दिवसांपेक्षा जास्त दिवसांच्या अकुशल रोजगाराची हमी देते. ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला जॉब कार्ड मिळण्याचा हक्क आहे. सदर योजना योग्यरित्या कार्यन्वित होवून त्याचा लाभ प्रत्येक गरजूंना मिळावा याकरिता तालुका पातळीवर समिती नेमण्यात येते व या समितीचे अध्यक्ष त्या विधानसभा क्षेत्रातील विधानसभा सदस्य असतात तिरोडा तालुक्यातील रोजगार हमी तालुका समितीची सभा तहसील कार्यालय तिरोडा येथे संपन्न झाली.




यामध्ये प्रामुख्याने तिरोडा तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत ४०७२ कामांना प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली असून त्यापैकी २८१६ कामे सुरु करण्यात आली. व ९९४ कामे पूर्ण झालेली असून १८२२ कामे अपुर्ण आहेत याचा आढावा घेण्यात आले तसेच मग्रारोहयो अंतर्गत नाला सरळीकरणाची कामे समाविष्ट करण्याबाबत आमदार महोदयांनी निर्देश दिले असून सदर कामे विभागांतर्गत करण्यात यावी असे सूचित केले. त्याचप्रमाणे लघु सिंचन विभागातर्फे तळाव खोलीकरण करून गाळ काढण्याचे कामे घेण्यात यावीत असेही निर्देश देण्यात आले.

सोबतच दक्षता समितीची बैठकही घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने तालुक्यातील गरजूंना नवीन रेशन कार्ड बनविणे ज्या लाभार्थ्यांना रेशन मिळत नाही अशा लाभार्थ्यांना रेशनचा लाभ मिळवून देणे, याकरिता प.स.क्षेत्रनिहाय कॅम्प घेण्याबाबतचे निर्देश आमदार महोदयांनी दिले यासोबतच मागील २ दिवसाआधी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या धानपिकाचे पंचनामे करून शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

या आढावा सभेला प्रामुख्याने तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार तथा समिती अध्यक्ष विजय रहांगडाले, भाजप तालुकाध्यक्ष, प.स.सभापती कुंता पटले, समिती सदस्य वंसत भगत, मदन पटले, रमेश कोकुडे, शुषमा कावळे, संध्या भरणे, माया रहांगडाले, एकनाथ सपाटे, खडकसिंग जगणे, मनोहर बुद्धे, प्यारेलाल पटले, रामप्रकाश पटले, उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड, तहसीलदार गजानन कोकडे, लघु पाटबंधारे विभाग उपभियंता गोवर्धन बिसेन, पुरवठा निरीक्षक जीवन राठोड, सा.बा.उपविभागीय अभियंता अनिल रहांगडाले, तालुका कृषी अधिकारी चव्हाण, सहा. गटविकास अधिकारी शितेश पटले, क.अभियंता वामन चव्हाण, गोंदिया पाटबंधारे विभाग उपविभागीय अभियंता एस.डी.पटले, व वन विभागाचे प्रमुख उपस्थित होते.